साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South!
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

भारत देश की सर्वश्रेष्ठ खुशबू
लई भारी ! १ नंबर
परिमल भारतवासी
तसेच निळकंठ, मोमेंटस,असली इंडियन कस्तुरी
शुभलाभ, ६ इन १ पाऊच १२० ग्रॅम रु.६५ चा ५० मध्ये
तसेच-डिओ, कापुर, शेंदर,अत्तरे,धुप अगरबत्ती होलसेल व रिटलसाठी
केवल अगरबत्ती
हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार,अ.नगर.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०१.०९.२०२६ | अंक नं. १३० | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹50000/- सोने खरेदीवर
₹20000/- चांदी खरेदीवर
₹5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच
मजुरीही सर्वात कमी.
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

# अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर ग्रामपंचायत अधिकारी संघाचा ‘मूक मोर्चा’

नगर - ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र कायदेशीर संरक्षण द्यावे, पारोळा तालुक्यातील घटनेतील दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने मान्य कराव्यात, या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघाच्या अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या वतीने १ सप्टेंबर रोजी मूक मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित मूक मोर्चात सहभागी झालेले ग्रामपंचायत अधिकारी.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे येथे ग्रामसभा सुरू असताना ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हा मोर्चा काढण्यात आला. कर्तव्य बजावत असताना झालेल्या या घटनेत त्यांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागला आणि त्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे संघाने निवेदनात नमूद केले आहे. या घटनेमुळे ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, कर्तव्य बजावताना अधिकाऱ्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे, अशी प्रमुख मागणी संघाने केली आहे.

मोर्चामध्ये पारोळा घटनेतील सर्व संबंधित आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना तातडीने अटक करावी व खटला जलदगती न्यायालयात चालवावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात तातडीने सुधारणा करून वर्षभरातील ग्रामसभांची संख्या मर्यादित करावी, ग्रामसभांच्या अनधिकृत चित्रीकरणावर निर्बंध आणावेत, सोशल मीडियावर ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

संवेदनशील, वादग्रस्त तसेच मोठ्या ग्रामपंचायतींच्या ग्रामसभा व बैठकींसाठी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरावीत आणि एक ग्रामपंचायत-एक ग्रामपंचायत अधिकारी या प्रमाणात पदनिर्मिती करावी, अशी मागणीही करण्यात आली.

कृषी, आरोग्य, समाजकल्याण आदी विभागांच्या योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित विभागाकडे सोपवावी, तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या लाभार्थी निवडीची प्रक्रिया तालुका स्तरावर संबंधित विभागामार्फत पारदर्शकपणे राबवावी, अशी मागणी संघाने केली.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर जेजुरकर, सरचिटणीस पोपटराव रासकर (दक्षिण), सहचिटणीस प्रमोद कानडे (उत्तर), युवराज पाटील, अशोक नरसाळे यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघाच्या वतीने देण्यात आला.

# शिक्षक पदभरतीसाठी खा.निलेश लंके यांचे जिल्हा परिषदेसमोर उपोषण सुरु




जिल्हा परिषदेसमोर उपोषण करताना खासदार निलेश लंके यांच्यासह कार्यकर्ते.

नगर - शिक्षकांची हजारो पदे रिक्त ठेवून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी खेळ सुरू असल्याचा आरोप करत खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली १ सप्टेंबरपासून अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या कार्यालयासमोर उपोषणाला सुरुवात झाली. शिक्षकांची रिक्त पदे भरा, विद्यार्थ्यांचे भविष्य वाचवा आणि शिक्षणाचा दर्जा टिकवा अशी जोरदार मागणी आंदोलनातून करण्यात आली.

जिल्ह्यात प्राथमिक व पदवीधर शिक्षक संवर्गातील ४७१, माध्यमिक विभागातील २,०५४ आणि प्राथमिक विभागातील मुख्याध्यापकांची १३२ पदे रिक्त असल्याचा दावा खा. लंके यांनी निवेदनातून केला आहे. एकूण किमान २६५७ पदे रिक्त असून याचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या अध्यापनाला बसत असल्याचे सांगत ही पदभरती तातडीने करावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच शिक्षकांवर बीएलओ ड्यूटी, मतदार यादी पुनरीक्षण, जनगणना, सर्वेक्षणे, विविध पोर्टलवर माहिती भरणे, विद्यार्थ्यांचे आधार व बँक खाते काढणे यासह विविध अशैक्षणिक कामांचा बोजा टाकला जात असल्याने अध्यापनासाठी वेळच उरत नसल्याचा आरोप करण्यात आला.

सर्व रिक्त शिक्षक पदे तातडीने भरा, पदभरतीचा कालबद्ध कृती आराखडा जाहीर करा, रिक्त पदांची तालुकानिहाय-शाळानिहाय-विषयनिहाय यादी जाहीर करा आणि शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त करा, या प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात आल्या आहेत.

शिक्षकच नाहीत आणि जे आहेत त्यांनाही अध्यापनाऐवजी अशैक्षणिक कामांत गुंतविले जात असेल, तर विद्यार्थ्यांचे भविष्य कोण घडवणार? असा सवाल उपस्थित करत प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कासाठी सुरु झालेला हा लढा असून, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा इशारा खा. लंके यांच्या वतीने देण्यात आला.

# ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा

## जिल्हा प्रशासन व लष्कर प्रशासनामध्ये सामंजस्य करार; पर्यटन विकासाला मिळणार नवी गती

नगर - ऐतिहासिक वारसा लाभलेल्या भुईकोट किल्ल्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा प्रशासन, अहिल्यानगर आणि लष्कर प्रशासन यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या विशेष प्रयत्नांतून हा करार झाला आहे. या करारामुळे भुईकोट किल्ल्याच्या विकासकामांना आता गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या सर्वांगीण विकासासाठी सामंजस्य करार करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व ब्रिगेडियर सुनील कुमार.

स्टेशन हेडक्वार्टर, अहिल्यानगर येथे स्टेशन कमांडर ब्रिगेडियर सुनील कुमार, आणि जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या उपस्थितीत आज सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर आणि उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील उपस्थित होते. भुईकोट किल्ला हा अहिल्यानगरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाचा महत्त्वपूर्ण ठेवा आहे. किल्ल्याच्या संवर्धनासोबतच परिसराचा नियोजनबद्ध विकास, आवश्यक पायाभूत सुविधा आणि पर्यटनाच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या विविध शक्यतांचा विकास करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. या सामंजस्य करारामुळे विकासकामांसाठी जिल्हा प्रशासन आणि लष्कर प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी होणार आहे.

### पर्यटन विकासाला मिळणार चालना

भुईकोट किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा जतन करत त्याचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास झाल्यास अहिल्यानगर जिल्ह्याच्या पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. किल्ल्याच्या विकासामुळे स्थानिक पर्यटनाला प्रोत्साहन मिळण्यासोबतच पर्यटकांच्या संख्येत वाढ होणार आहे. परिणामी स्थानिक पातळीवर रोजगार व व्यवसायाच्या संधी निर्माण होण्यासही मदत होणार आहे.

ऐतिहासिक वास्तूंचे जतन, त्यांचा योग्य पद्धतीने विकास आणि भावी पिढ्यांसाठी हा वारसा सुरक्षित ठेवणे, यासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांना या करारामुळे पाठबळ मिळणार आहे. भुईकोट किल्ल्याच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने झालेला हा सामंजस्य करार अहिल्यानगरच्या पर्यटन विकासातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पर्यटनासाठी मोठी संधी आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याकडे पाठपुरावा व पत्रव्यवहार केला होता. यासाठी त्यांचे सहकार्य मिळाले. जिल्ह्याला लाभलेला ऐतिहासिक वारसा स्थळांचा विकास करून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्याचा प्रयत्न असल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.
आकर्षक पगार
भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

नगर रोलिंग शटर
*नवीन शटर योग्य दरात मिळेल.
*जुने शटर रिपेरिंग व ग्रिसिंग केले जाईल
पत्ता- नगर अमरधाम जवळ, (लोंढे मळा) नालेगाव, अहिल्यानगर
रमेश ढवळे
7350682390

आठरे पाटील मेमोरियल हॉस्पिटल
नोकरीच्या शोधात आहात का ? अहिल्यानगर मधील नामांकित हॉस्पिटलमध्ये संधी तुमची वाट पाहतेय !
तात्काळ भरती सुरु आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | वॉर्ड बॉय | ३ | अनुभवींना प्राधान्य |
| २. | आया बाई | ३ | अनुभवींना प्राधान्य |
| ३. | स्विपर | २ | अनुभवींना प्राधान्य |
| ४. | नर्स (GNM / B.Sc) | ४ | GNM किंवा B.Sc नर्सिंग |
| ५. | फार्मासिस्ट | १ | D.Pharm / B.Pharm |

इच्छुक उमेदवारांनी आपली शैक्षणिक कागदपत्रे घेवून खालील पत्यावर सकाळी १० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत भेटावे.
* फ्रेशर आणि अनुभवी दोघेही अर्ज करू शकतात. * अनुभवानुसार आकर्षक वेतन
झोपडी कॅन्टीन समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर मोबाईल : ९१३०६०००९०

कॉलिटीत भारी किंमतीत कमी
पुरुषांच्या १५०० रु.पेक्षा जास्त खरेदीवर एक रिस्ट वॉच मोफत..
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी बिगसाईज ब्रँडेड रेडिमेड कपडे
शर्ट,क्राडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स,फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त
2XL पर्यंत..ब्रँडेड शर्ट, नाईट पॅन्ट, जीन्स रु.२०० पासून पुढे,
कार्गो पॅन्ट रु.२५० लहान मुला-मुलींचे ड्रेस रु.२०० पासून पुढे
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल | वेळ : सकाळी १०.३० ते रात्री ८.३० पर्यंत
पुरुषांसाठी सर्व काही शुभ मॉल
मधुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आनंदनगर मळा, अ.नगर 9028201188

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
प्रत्येक प्रसंगासाठी योग्य, आरामदायी आणि ट्रेंडी फुटवेअर
उपलब्ध नामांकित ब्रॅण्ड्स
adidas NIKE PUMA Reebok SKECHERS asics campus sparx KABOOS Bata RELAXO Paragon crocs Hush Puppies Lee Cooper RED TAPE Woodland WILDCRAFT CONVERSE KOLHAPURI मोजडी
आपल्या संपूर्ण कुटुंबासाठी फुटवेअरची परिपूर्ण शॉपिंग!
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या ! एकदा या.. पुन्हा याल!
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली,अ.नगर, मो : 9881531536

रूबी हॉल क्लिनिक, पुणे येथील प्रथितयश व निष्णात छाती (फुफ्फुस) विकार व ॲलर्जी विकार तज्ञ
डॉ. स्नेहा तिरपुडे
MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine) Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)
- नियोजित अहिल्यानगर भेट -
गुरूवार 3 सप्टेंबर 2026 रोजी स.9 ते दु.2 पर्यंत
जर आपणांस खालील व्याधी असल्यास
• फुफ्फुसाचे सर्व आजार • झोपे संबंधीचे सर्व विकार
• ॲलर्जी विकार • दमा • न्युमोनिया • न थांबणारा खोकला
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरूवारी अहिल्यानगर भेट
स्थळ : आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर
अधिक माहितीसाठी संपर्क : भरत : 8208783915

15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER
Career Ki Shuruwat DiSHA ke saath
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Get Any Course Just in 2700/-
MS-OFFICE, ADV. EXCEL,Tally Prime, Advance Tally, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING C++, CANVA, HTML.
दिल्ली गेट शाखा 9371051769
जुने बस स्टँड शाखा 9371151769
पाईपलाईन शाखा 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# क्रेडिट कार्ड बंद करण्याच्या बहाण्याने तरुणाची १ लाख २७ हजारांची ऑनलाईन फसवणूक

नगर – क्रेडिट कार्ड बंद करण्याच्या आमिषाने एका सुशिक्षित तरुणाची दिशाभूल करून बँक खात्यातून १ लाख २७ हजार ४९ रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी नगर शहरातील कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

कल्याण रोडवरील सुमन पार्क येथे राहणारे फिर्यादी सिंध्दात रवींद्र पांडे (वय २६) यांना वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकांवरून फोन आले. समोरील व्यक्तीने स्वतःचे नाव सीताराम सैनी असे सांगून आपण बँकेच्या मुख्य शाखेतून बोलत असल्याचे भासवले. त्याने व्हॉट्सपवर बनावट ओळखपत्र पाठवून विश्वास संपादन केला.

'तुमचे क्रेडिट कार्ड तात्पुरते बंद झाले असून दरमहा शुल्क टाळण्यासाठी ते कायमस्वरूपी बंद करावे लागेल,' असे सांगून त्याने फिर्यादीच्या मोबाईलचा कॉल वळवण्याचा सांकेतिक क्रमांक दाबण्यास भाग पाडले. त्यानंतर डेबिट कार्डची गोपनीय माहिती आणि आलेले गुप्त सांकेतिक क्रमांक (ओटीपी) मिळवून फिर्यादीच्या खात्यातून १ लाख २७ हजार ४९ रुपये परस्पर काढून घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पोलिसांत धाव घेतली.

कोतवाली पोलिसांनी संशयित आरोपी सीताराम सैनी याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटीची चौकशी करा

## गैरप्रकारातून झालेल्या निवडी रद्द करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक गट–ब परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच गैरप्रकाराचा लाभ घेऊन निवड झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित निवडी रद्द कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.


एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटीची सखोल चौकशी करा या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात देताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शिष्टमंडळ.

स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे लाखो विद्यार्थी गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील असून, आई–वडिलांच्या कष्टाच्या पैशातून वर्षानुवर्षे अभ्यास करून अधिकारी होण्याचे स्वप्न पाहतात. मात्र पैसे देऊन प्रश्नपत्रिका मिळवून गैरप्रकाराचा फायदा घेता येत असेल, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मेहनत का करावी, असा गंभीर प्रश्न या घटनेमुळे निर्माण झाला आहे. अशा प्रकारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताण, निराशा आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

विद्यार्थ्यांना उपकार नकोत, न्याय हवा; अधिकारी होण्याचा मार्ग पैशाचा नव्हे, तर ज्ञान, गुणवत्ता आणि प्रामाणिक मेहनतीचा असला पाहिजे, अशी भूमिका पक्षाच्या वतीने मांडण्यात आली. पेपरफुटीमागील संपूर्ण साखळी, त्यामागील आर्थिक व्यवहार आणि संबंधित व्यक्तींची भूमिका यांचा तपास करून दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. यापूर्वीही स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणि विश्वास निर्माण करण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक असताना पुन्हा पेपरफुटीचे प्रकरण समोर येणे ही अत्यंत गंभीर व संतापजनक बाब असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. जिल्हाध्यक्ष सीताराम काकडे व उपजिल्हाध्यक्ष प्रकाश पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी युवक जिल्हाध्यक्ष रामेश्वर निमसे, नगर तालुका अध्यक्ष शरद पवार, नामदेव पवार, महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड, फारुख रंगरेज, समीर पठाण, अजर शेख, रामदास ससे, चंद्रकांत पवार, राम झिने, आकाश निमसे, महेश पवार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ड्रेनेजसाठी पुन्हा खोदला सिमेंट काँक्रिटचा रस्ता; मनपाच्या ढिसाळ नियोजनाने लाखोंचे नुकसान

नगर – महापालिका प्रशासनाच्या ढिसाळ नियोजन आणि समन्वयाचा उत्तम नमुना शहरातील विकासकामांमध्ये दिसून आला आहे. आधी रस्ते तयार करणे आणि नंतर तेच रस्ते जेसीबीने खोदायचे हा पूर्वापार चालत आलेला पायंडा महापालिकेने तेली खुंट परिसरात पुन्हा एकदा राबविला आहे. कोट्यवधी रुपये खर्चून तयार केलेला तेली खुंट ते पावर हाऊस रस्ता जेसीबीद्वारे खोदण्यात आला आहे.


तेली खुंट चौकाकडून पावर हाऊसकडे जाणारा रस्ता जेसीबीने खोदण्यात येत आहे. (छाया – धनेश कटारिया)

शहरातील तेली खुंट चौकाकडून पॉवर हाऊसकडे जाणारा अतिशय महत्त्वाचा सिमेंट काँक्रिटचा नवीन रस्ता अवघ्या काही दिवसांपूर्वीच पूर्ण करण्यात आला होता. मात्र, रस्ता पूर्ण झाल्यानंतर आता ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी हाच रस्ता जेसीबीच्या साहाय्याने पुन्हा खोदण्यात आला आहे. रस्ता करण्यापूर्वी ड्रेनेज लाईनचे किंवा भूमिगत वाहिन्यांचे काम करणे बंधनकारक असतानाही प्रशासकीय यंत्रणेने या नियमाला हरताळ फासला. परिणामी, काही दिवसांपूर्वीच मोठा खर्च करून तयार करण्यात आलेला दर्जेदार काँक्रिटचा रस्ता फोडण्याची नामुस्की मनपा प्रशासनावर ओढवली आहे. आधी रस्ता करायचा आणि नंतर पुन्हा खोदायचा अशा अनाकलनीय कारभारामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून, जनतेच्या करातून जमा झालेला पैसा अशा प्रकारे धुळीस मिळवणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली जात आहे.

# बुऱ्हाणनगर परिसरात भरदिवसा घर फोडून पावणेतीन लाख रुपयांच्या दागिन्यांची चोरी

नगर – नगर जवळील बुऱ्हाणनगर परिसरातील गुगळे कॉलनी येथे दिवसाढवळ्या घरफोडी झाल्याची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी बंद घराचा कडी–कोयंडा तोडून घरातील कपाटात ठेवलेले तब्बल २ लाख ८३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले आहेत.

या प्रकरणी सविता रमेश बनसोडे (वय ४८, रा. गुगळे कॉलनी, बुऱ्हाणनगर, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सविता बनसोडे या २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते सायंकाळी साडेसहा वाजेच्या दरम्यान घर बंद करून बाहेर गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने कपाटातील ५० ग्रॅमचे मंगळसूत्र, दोन बांगड्या, चोकर, सोन्याची साखळी, ठुशी, मिनी गंठण, कानातले आणि अंगठ्या असा एकूण २ लाख ८३ हजार रुपये किमतीचा सोन्याचा ऐवज चोरून नेला.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड आणि पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. या चोरीचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड करत आहेत. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# सोयाबीन पिकात शेळ्या चारण्यास विरोध केल्याने महिलेसह सासऱ्यांना लोखंडी पाईपने बेदम मारहाण

नगर – शेतातील सोयाबीन पिकात शेळ्या चारण्यास विरोध केल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका महिलेला व तिच्या सासऱ्यांना लोखंडी पाईपने बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार मेहेकरी (ता. नगर) येथे घडला आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३१ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजेच्या सुमारास मेहेकरी येथील छाया मारुती बडे (वय ३८) यांच्या घरासमोर हा वाद झाला. छाया बडे यांनी आरोपींना 'आमच्या सोयाबीनच्या पिकात शेळ्या का चारता?' असा जाब विचारला. याचा राग आल्याने आरोपी प्रल्हाद संभाजी बडे आणि प्रमोद पोपट बडे (दोघे रा. मेहेकरी) यांनी छाया बडे यांना शिवीगाळ केली. तसेच हातातील लोखंडी पाईपने त्यांच्या उजव्या खांद्यावर व डाव्या पायाच्या मांडीवर जोरदार प्रहार करून त्यांना जखमी केले.

यावेळी छाया बडे यांचे सासरे आसाराम आप्पा बडे हे वाद सोडवण्यासाठी मध्ये आले असता, आरोपींनी त्यांनाही लोखंडी पाईप व लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली.

या हल्ल्यानंतर आरोपींनी दोघांनाही जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर छाया बडे यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी प्रल्हाद बडे आणि प्रमोद बडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार मारहाण व धमकावल्याचा गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार लोखंडे करत आहेत.

# भिंगारमध्ये भरधाव कारच्या धडकेत वृद्धाचा जागीच मृत्यू

नगर – भिंगार परिसरात नगर–पाथर्डी रस्त्यावरील शौर्य हॉटेलसमोर एका भरधाव सफारी कारने रस्त्याच्या कडेला उभी असलेल्या मोपेड दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात मोपेडचालक सखाराम भिवा शेलार (वय ६४, रा. केकती, निंबोडी) हे गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना ३१ ऑगस्टला दुपारी २ च्या सुमारास घडली.

या अपघाताबाबत विकास सखाराम शेलार (वय ३८, रा. केकती, निंबोडी) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, टाटा सफारी (क्र. एमएच १६ सीव्ही ०५५५) या गाडीचा चालक दिनकर बळवंत बडे (रा. जाटवड, मानुर, ता. शिरुर कासार, जि. बीड) याने आपले वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अविचाराने व भरधाव वेगात चालवले. अचानक गाडी उजव्या बाजूला वळवून तेथे उभ्या असलेल्या मोपेडला (क्र. एमएच १६ एझेड ८७०१)जोराची धडक दिली. या धडकेत मोपेडचे मोठे नुकसान झाले असून सखाराम शेलार यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, स.पो.नि.तेजश्री थोरात व पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी आरोपी चालक दिनकर बळवंत बडे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड अधिक तपास करत आहेत.

# एमएचटी–सीईटीच्या विद्यार्थ्यांचा डेटा विकल्याचा आरोप

## गुन्हा दाखल करण्याची मागणी; पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर – एमएचटी–सीईटी, पीसीएम आणि इतर परीक्षांसाठी अर्ज केलेल्या तब्बल १८ लाख विद्यार्थ्यांचा गोपनीय डेटा काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने चोरून खासगी सल्लागार संस्थांना विकण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याच चोरीच्या डेटाचा वापर करून, १० वी–१२वीत जेमतेम पास किंवा ३०ते ३५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट सीईटीत ९९ आणि १०० पर्सेंटाइल मिळवून दिले जात असल्याचा दावा करत या प्रकाराविरूध्द संभाजी ब्रिगेड आणि प्राध्यापक नारायण शिनगारे यांनी पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत गुन्हा दाखल करण्याची व उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.


एमएचटी–सीईटीच्या विद्यार्थ्यांचा डेटा विकल्याप्रकरणाची चौकशी करून गुन्हा दाखल करावा या मागणीचे निवेदन पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांना देताना संभाजी ब्रिगेडचे शिष्टमंडळ.

प्रा. शिनगारे यांनी दिलेल्या 'माहितीनुसार, हा घोटाळा अत्यंत पध्दतशीरपणे चालवला जात आहे. अवघ्या २० हजार रूपयांत कोणत्याही सीईटी परीक्षेचा संपूर्ण डेटा काही मिनिटांत पेनड्राईव्हमध्ये उपलब्ध करून दिला जात आहे. या लीक झालेल्या एक्सेल शीटमध्ये विद्यार्थ्यांचे नाव, जिल्हा, तालुका, गाव, जात–प्रवर्ग, मोबाईल क्रमांक आणि ई–मेल आयडी अशी अत्यंत वैयक्तिक माहिती समाविष्ट आहे. या माहितीचा गैरवापर करून, खासगी एजन्सीज विद्यार्थ्यांचे इन्स्टाग्राम व इतर सोशल मीडिया प्रोफाइल्स शोधतात, त्यांची आर्थिक परिस्थिती तपासतात आणि थेट फोन करून १० ते १२ लाख रूपयांच्या बदल्यात गुण वाढवून देण्याचे आमिष दाखवतात. या रॅकेटव्दारे महाराष्ट्रातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये डायरेक्ट ॲडमिशन मिळवून देण्याचे आश्वासन दिले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे आणि प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत यांनी आरोप केला आहे की, या घोटाळ्यामागे सीईटी सेलमधील डेटा हाताळणारे अधिकारी, परीक्षा घेणारी तांत्रिक कंपनी, ठराविक परीक्षा केंद्रांचे मालक आणि या कन्सल्टन्सी संस्थांची मोठी साखळी कार्यरत आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आंदोलकांची बाजू ऐकून घेत या संपूर्ण प्रकरणाची सायबर सेलकडून सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले असून, गैरप्रकार आढळल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.

# सुदाम बल्लाळ यांचे अल्प आजाराने निधन

नगर – नवजीवन कॉलनी, पूनम मोतीनगर येथील रहिवासी सुदाम विठ्ठलराव बल्लाळ (वय ७६) यांचे १ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हरीष, सुमीत, अभिषेक यांचे ते वडील होत.


# गुलाबबाई राका यांचे हृदयविकाराने निधन

नगर – चाकण करंदी शिक्रापूर रोड येथील रहिवासी सौ. गुलाबबाई बन्सीलाल राका (करंदीवाला) (वय ८०) यांचे ३० ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम, करंदी गावामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. बन्सीलाल राका यांच्या पत्नी तर जयकुमार, चेतन व राणी चोरडिया यांच्या त्या आई होत.



# सुभाष गांधी यांचे आकस्मिक निधन

नगर – साईनगर नक्षत्र लॉन मागे, बुरुडगाव रोड येथील रहिवासी सुभाष पन्नालाल गांधी (शहरटाकळीवाला) (वय ७८) यांचे १ सप्टेंबर रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सपना, स्मिता व श्रीपाल गांधी यांचे ते वडील होत.




पावसाअभावी नुकसान झालेली पिके, फळबागांचे सरसकट पंचनामे करा या मागणीचे निवेदन तहसीलदार मिलिंद कुलथे यांना देण्यात आले.

# पावसाअभावी नुकसान झालेली पिके, फळबागांचे सरसकट पंचनामे करा

नगर – नगर तालुक्यातील नारायणडोहो परिसरात यंदाच्या खरीप हंगामात पावसाने दडी मारल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. ऑगस्ट महिना संपला तरी समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने खरीप पिके तसेच फळबागा करपून गेल्या आहेत. त्यामुळे या परिसरातील पिके व फळबागांचे सरसकट तातडीने पंचनामे करावेत तसेच शेतकर्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नारायणडोहोचे माजी सरपंच शंकरराव साठे यांनी तहसीलदार मिलिंद कुलथे यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.

पावसाअभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, अनेक शेतकऱ्यांच्याा हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने नारायणडोहो परिसरातील सर्व खरीप पिके व फळबागांचे सरसकट पंचनामे करून शेतकर्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

याबाबत माजी सरपंच शंकरराव साठे तसेच नारायणडोहो ग्रामस्थांच्या वतीने तहसीलदारांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. पावसाअभावी आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकर्यांना प्रशासनाने तातडीने दिलासा द्यावा आणि नुकसानग्रस्त पिकांचे सरसकट पंचनामे करावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# माजी सैनिकांना राजकीय आरक्षण द्या

## स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्यपदाची मागणी, ग्रामपंचायतीपासून महापालिकेपर्यंत माजी सैनिकांसाठी एक जागा आरक्षित करा

नगर – देशाच्या संरक्षणासाठी आयुष्याचा अमूल्य काळ समर्पित करणाऱ्या व समाजात राष्ट्र निष्ठेने काम करणाऱ्या माजी सैनिकांना राजकीय क्षेत्रातही प्रतिनिधित्वाची संधी मिळावी, यासाठी जय हिंद फाउंडेशन अहिल्यानगरच्या वतीने आमदार सत्यजित तांबे यांना राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. माजी सैनिकांच्या शिष्टमंडळाने निवेदन देऊन माजी सैनिकांना राजकीय आरक्षण तसेच विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून प्रतिनिधित्व देण्याची मागणी केली.


आमदार सत्यजित तांबे यांना निवेदन देताना माजी सैनिक.

माजी सैनिकांच्या या मागणीचा राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन आमदार सत्यजित तांबे यांनी शिष्टमंडळाला दिले. माजी सैनिकांच्या प्रश्नांबाबत शासन स्तरावर सकारात्मक भूमिका घेऊन मुख्यमंत्र्यांकडे यासंदर्भात पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, जगन्नाथ खामकर, ताराचंद घागरे, प्रकाश कोटकर, महादेव शिरसाठ, संजय पाटेकर, संदीप गुंजाळ, भिकाजी भागवत आदी उपस्थित होते.

जय हिंद फाउंडेशन तसेच महाराष्ट्र राज्यातील विविध सैनिक संघटनांच्या माध्यमातून माजी सैनिकांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी सातत्याने मागणी केली जात आहे. देशसेवेतून निवृत्त झाल्यानंतरही अनेक माजी सैनिक सामाजिक कार्य, जनजागृती, नागरिकांच्या समस्या सोडविणे आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रियपणे योगदान देत आहेत. मात्र, निवडणूक लढण्यासाठी लागणारा मोठा आर्थिक खर्च आणि इतर अडचणी यामुळे अनेक माजी सैनिकांना निवडणुकीच्या राजकारणात प्रत्यक्ष सहभागी होता येत नाही. त्यामुळे माजी सैनिकांच्या अनुभवाचा, शिस्तीचा आणि प्रशासनातील कार्यपद्धतीचा उपयोग समाजाच्या विकासासाठी व्हावा, यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांना स्वीकृत सदस्य म्हणून प्रतिनिधित्व देण्याची मागणी करण्यात आली आहे.

माजी सैनिकांना ग्रामपंचायतीमध्ये एक स्वीकृत सदस्य, नगरपरिषदेमध्ये एक स्वीकृत सदस्य, पंचायत समितीमध्ये एक स्वीकृत सदस्य, नगरपालिका तसेच महानगरपालिकेत एक स्वीकृत सदस्य देण्यात यावा, अशी मागणी जय हिंद फाउंडेशनच्या माध्यमातून करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषदेतही माजी सैनिकांसाठी एक स्वीकृत सदस्याची जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय राज्यपाल नियुक्त आमदारांमध्येही माजी सैनिकांना प्रतिनिधित्व देण्यासाठी एक जागा निश्चित करण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आगामी निवडणुकांमध्ये माजी सैनिकांना प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत स्वीकृत सदस्यपदासाठी प्रतिनिधित्व मिळेल, याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी शिवाजी पालवे यांनी केली.

# गृहिणी

## आरोग्य

### निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली

पूर्वीच्या काळी माणूस आजारी पडल्यानंतरच डॉक्टरकडे जात असे. पण आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत हा विचार आता जुना झाला आहे. आज आजार येण्याची वाट पाहणे म्हणजे स्वतःच्या जीवाशी खेळण्यासारखे आहे. म्हणूनच डॉक्टर नेहमी सांगतात की वर्षातून किमान एकदा तरी रुटीन चेकअप अर्थात नियमित आरोग्य तपासणी करून घ्या.रुटीन चेकअप म्हणजे तरी काय, असा प्रश्न अनेकांना पडतो. यात कोणतीही मोठी किंवा घाबरण्यासारखी प्रक्रिया नसते. रक्तदाब मोजणे, वजन तपासणे, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन, कोलेस्ट्रॉल, थायरॉईड, लघवीची तपासणी आणि हृदयाचा ईसीजी या साध्या तपासण्या यात केल्या जातात. या छोट्या वाटणाऱ्या तपासण्या आपल्या शरीरात आत काय सुरु आहे याचा पूर्ण आरसा दाखवतात. अनेकदा आपल्याला बाहेरून काहीच त्रास जाणवत नाही, आपण स्वतःला ठणठणीत समजतो, पण आतमध्ये साखर किंवा रक्तदाब हळूहळू वाढत असतो. हे वाढणे वेळीच कळले तर महागड्या गोळ्या औषधांशिवाय केवळ योग्य आहार, रोजचा चालणे-व्यायाम आणि वेळेवर झोप याने ते पूर्णपणे नियंत्रणात येते.आजकाल तीस ते चाळीस या वयोगटातच मधुमेह आणि हृदयविकाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. बैठे काम, सतत मोबाईल आणि लॅपटॉपवर काम, जंक फूड, अपुरी झोप आणि सततचा मानसिक ताण हे त्याचे मुख्य कारण आहे. रुटीन चेकअप या धोक्याची घंटा अगोदरच वाजवते. विशेषतः ज्यांच्या घरात मधुमेह, रक्तदाब किंवा हृदयविकाराचा इतिहास आहे, ज्यांचे वजन जास्त आहे किंवा जे व्यसन करतात त्यांनी तर ही तपासणी अजिबात चुकवू नये.अनेक जण हा खर्च वाटून तपासणी टाळतात, पण एकदा मोठा आजार झाल्यावर होणारा लाखोंचा खर्च आणि मनस्ताप यापेक्षा ही छोटी तपासणी कितीतरी परवडणारी आहे. लक्षात ठेवा, रुटीन चेकअप म्हणजे आजाराला घाबरणे नव्हे, तर आजाराला वेळीच रोखणे आहे. म्हणूनच आजच ठरवा आणि आपल्या जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घेऊन आपली नियमित तपासणी करून घ्या, कारण निरोगी शरीरातच निरोगी भविष्य दडलेले आहे.

## पाककला

### चॉकलेट शिरा

**साहित्य :** बारीक रवा १ वाटी, साखर ३/४ वाटी, पाणी २ वाटी, कोको पावडर २ चमचे, डार्क चॉकलेट किसलेले १/४ वाटी, तूप ४ चमचे, दुध १/२ वाटी, काजू तुकडे १ चमचा, बदाम काप १ चमचा, वेलची पावडर १/४ चमचा, चिमूटभर मीठ

**कृती :** प्रथम एका कढईत २ चमचे तूप गरम करून त्यात काजू बदाम हलके भाजून बाजूला काढून ठेवा. त्याच कढईत उरलेले तूप घालून त्यात रवा मध्यम आचेवर खरपूस आणि सुगंध येईपर्यंत भाजून घ्या. दुसऱ्या भांड्यात पाणी आणि दुध एकत्र गरम करा. भाजलेल्या रव्यात हळूहळू गरम पाणी-दुधाचे मिश्रण घालून गुठळ्या होऊ न देता सतत ढवळत रहा. रवा फुलून आल्यावर त्यात साखर घालून मिश्रण एकजीव करा. साखर विरघळल्यावर त्यात कोको पावडर आणि चिमूटभर मीठ घालून चांगले मिसळा. मिश्रण घट्ट होत आल्यावर त्यात किसलेले डार्क चॉकलेट घालून ते वितळेपर्यंत परतवा. वरून भाजलेले काजू बदाम आणि वेलची पावडर घालून एक मिनिट झाकण ठेवा. तयार चॉकलेट शिरा गरम गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### दुकानासाठी...

तिजोरी ही सर्वात महत्वाची जागा आहे. गल्ला नेहमी नैऋत्य कोपऱ्यात ठेवावा आणि त्याचे तोंड उत्तर दिशेला उघडेल असा असावा. उत्तर दिशा ही कुबेराची दिशा मानली जाते. गल्ल्यावर कधीही धूळ साचू देऊ नये आणि गल्ल्यात लक्ष्मीचा फोटो ठेवताना तो कधीही रिकामा ठेवू नये. रोज सकाळी दुकान उघडल्यावर गल्ल्याची पूजा करणे शुभ मानले जाते.

## सौंदर्य

थोडी लिपस्टिक, थोडे तूप आणि मध एकत्र करून एका डबीत भरून ठेवा. ओठ फाटत असतील तर हा घरगुती लिप बाम अतिशय उपयोगी पडतो.

## सल्ला

बासुंदी जवळजवळ तयार होत आली की त्यात थोडा किसलेला खवा घातल्यास बासुंदी झटपट घट्ट होते आणि चवही अधिक चविष्ट लागते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, भरणी २५|४३, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामाचा ताण वाढेल, अचानक धनलाभ होईल.

**वृषभ :** कौटुंबिक वाद संपतील, मन प्रसन्न राहील.

**मिथुन :** जुनी ओळख कामी येईल, प्रवासाचे योग आहेत.

**कर्क :** खर्च वाढेल, पण मान-सन्मान मिळेल.

**सिंह :** नवीन संधी मिळेल, आत्म विश्वास वाढेल.

**कन्या :** आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल, काम रखडेल.

**तूळ :** भागीदारीत फायदा होईल, जोडीदाराची साथ मिळेल.

**वृश्चिक :** शत्रू पराभूत होतील, कोर्ट-कचेरी कामात यश मिळेल.


**धनु :** मुलांकडून आनंदाची बातमी मिळेल, शिक्षणात यश.

**मकर :** घरात पाहुणे येतील, मालमत्तेचा प्रश्न सुटेल.

**कुंभ :** भावंडांशी मतभेद होतील, पण धाडस वाढेल.

**मीन :** वाणीवर नियंत्रण ठेवा, बोलण्यामुळे काम बिघडू शकते.

## शब्दगंध क्र. ७५०७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) एका दिवसात आक्रमिलेला रस्ता; टप्पा ४) ज्यांचे अभंग प्रसिद्ध आहेत, असे मराठी संत - ++++ महाराज ६) निवारण करणारा ७) अजिबात सरळ नसलेला ११) स्वाद; गोडी; चव १३) खट्ट असा मोठा आवाज; भांडण; अडकवण १४) पाताळातील एका मुख्य नागाचे नाव १६) नाव; जहाज ; अंगुल १७) ओकारी येईल अशी मानसिक व शारीरिक स्थिती १८) जमीन भाजण्याची क्रिया २०) रामायणातील वाली या वानर राजाचा मुलगा २१) संकटातून सोडविणारा

**उभे शब्द :-** १) कौरव-पांडवांचा इतिहास २) ज्याअर्थी; तापामुळे तोंडापाशी उठणाऱ्या पुटकुळ्या ३) अंगावरून वारे जाणे; अर्धांगवायू; पक्षघात ४) तिरसट; हेकट; खेकसणारा ५) गांवढळ; रानटी ८) श्रम; मेहनत ९) मिरचीची चव १०) दरोडा; दरवडा १२) समर्थ; क्षमता असलेला १५) घाणेरडा; गलिच्छ १६) मोठ्या रस्त्याला मिळणारी छोटी गल्ली १८) क्रोध १९) सूड; वचपा २०) आकडा; मांडी

### शब्दगंध क्र. ७५०६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भा | ज | प | ■ | स | प | शे | ल |
| ज | ■ | रि | का | म | टे | क | डा |
| क | व | च | ■ | ज | ल | ■ | ख |
| ■ | स | य | ■ | दा | ■ | उ | ■ |
| छा | न | ■ | वा | र | स | दा | र |
| या | ■ | गो | डी | ■ | म | ह | ती |
| चि | म | णी | ■ | शी | ■ | र | ■ |
| त्र | स्त | ■ | उ | त | र | ण | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : कोणी आपलं वाईट केलं म्हणून आपण त्याच वाईट वागायचं नसतं, कारण सोनं कितीही घाणीत पडलं तरी त्याची किंमत कमी होत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पाण्यात आपले प्रतिबिंब उलटे का दिसते?

लहानपणी नदीच्या किंवा विहिरीच्या काठावर उभे राहून आपण सगळ्यांनीच पाण्यात आपला चेहरा पाहण्याचा प्रयत्न केला आहे. कधी कधी शांत पाण्यात चेहरा अगदी आरशासारखा स्पष्ट दिसतो तर कधी कधी तो उलटा दिसतो. एखाद्या डबक्यात किंवा चमच्यात पाहिले तर डोके खाली आणि पाय वर असे विचित्र चित्र दिसते. असे का होते, यामागे काही जादू आहे का? नाही, यामागे आहे प्रकाशाचा एक सुंदर नियम.आपल्याला कोणतीही वस्तू कशी दिसते? तर त्या वस्तूवर प्रकाश पडतो आणि तो प्रकाश परावर्तित होऊन आपल्या डोळ्यांत येतो तेव्हा ती वस्तू दिसते. आरसा किंवा पाणी हे देखील असेच काम करतात. ते प्रकाशाला परत पाठवतात. म्हणूनच त्यात आपले प्रतिबिंब दिसते. आता हा आरसा कसा आहे यावर ते प्रतिबिंब सरळ दिसणार की उलटे दिसणार हे ठरते.

विज्ञानात आरशाचे दोन प्रकार सांगितले आहेत. एक म्हणजे सपाट आरसा आणि दुसरा म्हणजे वक्र आरसा. आपल्या घरातील आरसा हा सपाट असतो, त्यामुळे त्यात आपण जसे आहोत तसेच दिसतो. फक्त उजवा हात डावा दिसतो. शांत असलेले तळे किंवा बादलीतील पाणी हे देखील सपाट आरशासारखे काम करते. त्यामुळे त्यात प्रतिबिंब सरळच दिसते.पण जेव्हा पाण्याचा पृष्ठभाग हलतो, त्यावर लहरी येतात तेव्हा तो वक्र बनतो. किंवा आपण चमच्याच्या आतल्या बाजूला पाहिले तर तो आत वाकलेला आरसा बनतो. अशा आत वाकलेल्या भागाला अंतर्वक्र आरसा म्हणतात.

या आरशाचा एक विशेष गुण असतो. तो प्रकाशाच्या सर्व किरणांना एका ठिकाणी जमा करतो. त्यामुळे जेव्हा आपण त्यात पाहतो तेव्हा वरून येणारा प्रकाश खाली जातो आणि खालून येणारा प्रकाश वर येतो. परिणामी आपले प्रतिबिंब पूर्णपणे उलटे दिसते. आपले डोके खाली दिसते आणि हनुवटी वर दिसते.याच्या उलट चमच्याच्या बाहेरील फुगीर भागात पाहिले तर चेहरा सरळ पण थोडा लांबट दिसतो. यालाच बहिर्वक्र आरसा म्हणतात. मोटारगाड्यांमध्ये मागचे वाहन पाहण्यासाठी हाच आरसा वापरला जातो. निसर्गातही हा नियम दिसतो. उंच डोंगराखाली असलेल्या नितळ सरोवरात डोंगराचे प्रतिबिंब उलटे पडलेले दिसते.

खगोलशास्त्रात मोठमोठ्या दुर्बिणी बनवण्यासाठी शास्त्रज्ञ याच अंतर्वक्र आरशाचा वापर करतात. त्यामुळे दूरवरच्या ताऱ्यांचे उलटे पडलेले प्रतिबिंब एकत्र करून त्याचा अभ्यास करता येतो.म्हणूनच पाणी आपल्याला फसवत नाही, तर पाण्याच्या पृष्ठभागाचा आकार आणि प्रकाशाचे परावर्तन हा खेळ आपल्याला वेगवेगळी चित्रे दाखवतो. हा प्रयोग तुम्ही घरी नक्की करून पहा. एक स्टीलचा चमचा घ्या. त्याच्या आतल्या बाजूने आपला चेहरा जवळ नेऊन पहा, तो उलटा दिसेल. आता तोच चमचा थोडा लांब न्या, पुन्हा चित्र बदलेल. विज्ञान हे पुस्तकात वाचण्यापेक्षा अशा छोट्या प्रयोगातून शिकले तर ते कधीच विसरले जात नाही.

### नक्कल

एका घनदाट जंगलात एक कावळा राहत होता. तो खूपच काळा होता पण त्याला आपल्या काळ्या रंगाचा खूप राग यायचा. त्याला वाटायचे आपणही इतर पक्ष्यांसारखे सुंदर दिसावे. एके दिवशी त्याला जंगलात फिरताना मोरपिसांचा एक ढीग सापडला. मोराने आपली जुनी पिसे टाकली होती. ती सुंदर निळी हिरवी पिसे पाहून कावळ्याला एक कल्पना सुचली. त्याने ती सर्व मोरपिसे आपल्या अंगाला लावली आणि तो स्वतःला मोर समजू लागला.


तो मोठ्या दिमाखात इतर कावळ्यांमध्ये गेला आणि म्हणाला, पाहा मी किती सुंदर दिसतो, मी आता तुमच्यातला नाही, मी मोर आहे. पण त्याची चाल, त्याचा कर्कश आवाज लपत नव्हता. इतर कावळ्यांनी त्याला ओळखले आणि त्याला पळवून लावले. ते म्हणाले तू कावळाच आहेस, मोरपिसे लावल्याने तू मोर होणार नाहीस. कावळा निराश होऊन मोरांच्या थव्यात गेला.

तो म्हणाला, पाहा मी पण तुमच्यासारखाच सुंदर आहे, मला तुमच्यात घ्या. मोरांनी त्याच्याकडे पाहिले आणि त्याचा कर्कश आवाज ऐकला. त्यांना लगेच कळले की हा मोर नाही तर नक्कल करणारा कावळा आहे. मोरांनीही त्याला टोच मारून पळवून लावले.

बिचारा कावळा आता एकटा पडला. त्याची लावलेली मोरपिसेही गळून पडली होती. त्याला आपली चूक समजली. तो आपल्या कावळा मित्रांकडे परत गेला आणि त्यांची माफी मागितली. तो म्हणाला, मी दुसऱ्याची नक्कल करून स्वतःचे खरे रूप विसरलो होतो.

तात्पर्य - दुसऱ्याची नक्कल करून आपण मोठे होत नाही तर आपले असलेले स्थानही गमावून बसतो. स्वतःवर विश्वास ठेवून आपल्या गुणांना वाढवणे हेच खरे यश आहे.

## आत्मशक्ति



आत्मा अमर्यादित ज्ञान, अमरत्त्व, निःस्वार्थ प्रेम, निर्भयता, एकता आणि आनंद ह्या अवस्थेत यथास्थित स्नान करीत असतो. परंतु ही सत्यस्थिती आपल्यापैकी फारच थोड्यांना माहित असते. आम्ही आमचे शरीर आणि मन ओळखतो पण आत्म्याला विसरलो आहोत. बाह्य जगापुरतीच आपली दृष्टी चालते. आपला अधिकाधिक वेळ सांसारिक व्यवहारात आणि कामात निघून जातो. फारच थोडे लोक अंतरी दृष्टी टाकण्यासाठी वेळ काढतात.

अंतरीचे जग व बाह्य जग बरोबरीनेच चालते. मात्र आम्ही एक अधिक सुंदर व परिपूर्ण जगापासून अनभिज्ञ आहोत ज्याची आम्ही कल्पनाही करू शकत नाही.एवढा अमर्यादित आनंद व ज्ञानाचा महासागर आमच्यापासून लपून कसा राहिला? आमची ही स्थिती पाण्यात पोहणाऱ्या तरीही पाणी शोधणाऱ्या माश्यासारखीच आहे!

### मर्यादित दृष्टी

ह्या मर्यादित दृष्टिकोनाचे काय कारण असावे बरे? आमचे शरीर, मन आणि इंद्रिये कर्म करण्यासाठी आत्म्याला सहाय्य कसे करतात ?आम्ही आपले मन, शरीर आणि इंद्रिये ह्यांना ताकदवान बनविले आहे म्हणून आपल्या खऱ्या स्वरुपाला ओळखीत नाही. जेव्हा आत्मा मनुष्य योनीत येतो तेव्हा त्याला हे शरीर व एक मन दिले जाते. ह्या जगात काम करण्यासाठी आत्म्याला ह्यांची आवश्यकता असते. आत्मा काही जड पदार्थापासून बनलेला नाही. तो चैतन्यशील आहे. परमात्मा ज्या तत्त्वांनी बनला आहे त्याच तत्त्वांनी आत्माही बनला आहे. जर आम्हाला हे शरीर मिळाले नसते तर आम्ही कोणत्याही पदार्थाला स्पर्श करू शकलो नसतो. कोणत्याही पदार्थाशी संबंध जोडू शकलो नसतो. आम्ही हालचाल करू शकलो नसतो अथवा कोण्या पदार्थाला पकडू शकलो नसतो अथवा जगातील कोणत्याही पदार्थाची मोडतोड करू शकलो नसतो. शिवाय अदृश्य स्थितीत राहिलो असतो.शरीर नसते तर आमच्यात मेंदू नसता. एखाद्या संगणकासारखे बाह्य विश्वातील संदेश मेंदू मनाकडे व आत्म्याकडे पाठवितो. त्याचा अर्थ लावला जातो व सार्थ संदेश पुनश्च विश्वाकडे, बाह्य जगाकडे पाठविला जातो. मेंदू पाच इंद्रियांचे नियमन राखतो. जेव्हा आमच्या डोळ्यावर प्रकाश पडतो तेव्हा त्याचे संकेत डोळ्यांच्या मज्ञातंतूमार्फत मेंदूकडे पाठविले जातात.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

आपल्या मोठ्यांकडून जे ज्ञान आपल्याला मिळतं ते आपली संस्कृती आणि पर्यावरण यांनुसार असतं. आपल्या शरीरासाठी काय योग्य हे विज्ञान सांगतं आणि आपल्या मनासाठी काय योग्य हे अध्यात्म सांगतं.आपल्या मुलांची काळजी घेणारी मदतनीस ते काम तिची नोकरी म्हणून करते. ते त्यांच्या कामात तरबेज असतात पण कुटुंबातील आजीआजोबा, आईवडील आणि इतर सदस्य ज्या प्रकारे प्रेमाची, सामर्थ्याची आणि आशीर्वादाची स्पंदनं बाळाला देतात त्या प्रकारे मदतनीस देऊ शकत नाही.बाळाच्या आईचे तिच्या सासूसासऱ्यांशी चांगले संबंध नसतील तरीही त्या बाळाचं त्याच्या आजीआजोबांच्या आत्म्याशी एक विशेष कार्मिक खातं आहे हे आईने समजून घ्यायला हवं.बाळाच्या वाढीसंबंधी अनेक मतभेद असू शकतात पण त्याचं वादविवादात रूपांतर होणं आपल्याला परवडणारं नाही. बाळाच्या आनंदासाठी आणि आरोग्यासाठी घरात सामंजस्याची ऊर्जा निर्माण करणं हेच आपलं प्राधान्य आहे.

### पूर्वज आत्मा

सुरेश ओबेरॉय : आपण चर्चा करत होतो की, पालकांचा त्यांच्या मुलांवर खूप खोलवर प्रभाव पडतो. बाळ आईच्या उदरात असल्यापासूनच त्यांनी बाळाची काळजी घेतली पाहिजे कारण आईच्या उदरात असताना बाळाची ग्रहण क्षमता खूप जास्त असते.शिवानीदीदी : लहान बाळांशी बोलताना आपण एका आत्म्याशी बोलत आहोत हे नेहमी लक्षात ठेवायला हवं. आपण हे समजलं पाहिजे की, बाळाच्या आत्म्याला नाही, त्याच्या शरीराला, शारीरिकदृष्ट्या शक्तिशाली बनवायचं आहे. समजा, बाळाचा शरीररूपी पोशाख परिधान करण्याआधी तो आत्मा पूर्वजन्मात एका ऐंशी वर्षीय वृद्धाचा होता. आत्मा एखाद्या सीडीसारखा आहे. पूर्वी तो दुसऱ्या सीडी प्लेअरमध्ये होता. आताचा प्लेअर (शरीर) अजून पूर्णपणे तयार नाहीये. पण सीडी व्यवस्थित रेकॉर्डेड आहे त्यामुळे आत्म्याला सगळं समजतं आहे.माणूस जेव्हा कोमामध्ये असतो तेव्हा तो ऐकू किंवा बोलू शकत नाही. त्या वेळी त्याला सगळ्या गोष्टींचं नीट आकलनही होत नसेल पण त्याचा आत्मा सगळं ग्रहण करत असतो. आत्मा शरीराशी किंवा मेंदूशी संबंध प्रस्थापित करू शकत नाही आणि मेंदू शरीराला संकेत पाठवू शकत नाही. शरीर पूर्णपणे कार्यरत नसलं, वर्तमानात आत्मा स्वतः ला व्यक्त करण्यास सक्षम नसला तरीही तो ऐकत असतो आणि अनुभवतही असतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मित्र म्हणाला, पैशाने सुख विकत घेता येतं का?  
मी म्हणालो, नाही रे!  
तो म्हणाला, मग पैसे कुठे मिळतात?  
मी म्हणालो, हे मात्र मलाही अजून सापडलं नाही!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* रक्ताभिसरणाचा शोध कोणी लावला?

– विल्यम हार्वे

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कुळीथ

गर्द तपकिरी रंगाचे कुळीथ सहसा गरीब लोकांचे कडधान्य समजले जाते, परंतु त्यामध्ये असणाऱ्या औषधी गुणधर्मामुळे आरोग्य सुधारण्यासाठी व झालेला आजार बरा करण्यासाठी शहरी व श्रीमंत लोक सुद्धा याचा आहारामध्ये वापर करीत आहेत. मराठीमध्ये 'कुळीथ' म्हणून ओळखले जाणारे कुळीथ 'लेग्युमिनेसीडी' या कुळातील आहे.

साधारणतः कुळथाची पेरणी ही आषाढ महिन्यात केली जाते. त्याचे रोप दीड ते दोन फूट उंचीचे असते व ते जमिनीवर पसरते. हे रोप साधारणतः उडदाच्या रोपासारखे असते व याची पाने उडदाच्या पानांसारखीच असतात. कुळथाच्या रोपाला शेंगा येऊन त्या वाकड्या व लवयुक्त असतात. याच शेंगांमध्ये बदामी किंवा भुरकट रंगाचे चार ते सहा दाणे असतात. हे दाणे अळशीच्या दाण्यांसारखेच दिसतात. लाल, पांढरे आणि काळे असे तीन प्रकार कुळथाचे आहेत. या तीनही प्रकारांत आरोग्याच्या दृष्टिकोनातून काळे कुळीथ उत्तम असतात. परंतु काळे कुळीथ क्वचितच आढळतात.

औषधी गुणधर्म :कषायस्वादुरूक्षोष्णाः कुलत्थारक्तपित्तलाः ।घ्नन्ति शुक्राश्मरीं शुक्रं दृष्टिं शोफं तथोदरम् ।। अष्टांग संग्रह सूत्रस्थान ७

आयुर्वेदानुसार : कुळीथ चवीला तुरट, गोड, आम्लविपाकी व उष्ण आहे. तसेच ते रक्तपित्तकर, रुक्ष व मूत्रल आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : कुळथामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस, प्रथिने, तंतुमय व पिष्टमय पदार्थ, 'अ' व 'ब' जीवनसत्त्व इत्यादी पोषक घटक असतात. उपयोग :१) वरील गुणधर्मामुळे ते सर्दी, खोकला, दमा या रोगांवर, तसेच स्थौल्य, मुतखडा या आजारांवरही उपयुक्त आहे. मुतखडा लघवीतून विरघळून जाण्यासाठी दररोज पाच वाट्या कुळथाचे सूप किंवा

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**  
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# भाई सथ्था नाईट हायस्कूलने शिक्षणदूत अभियानातून १६८ विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणले


भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शिक्षणदूतांचा सत्कार करण्यात आला.

नगर – विविध कारणांमुळे अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व जुनिअर कॉलेजच्या वतीने राबविण्यात आलेल्या शिक्षणदूत अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अभियानांतर्गत शाळाबाह्य तसेच अर्धवट शिक्षण सोडलेल्या तब्बल १६८ विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी ४९, तर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ११९ विद्यार्थ्यांना प्रवेशित केले. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सर्वाधिक विद्यार्थी प्रवेशित करणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये विविध कारणांमुळे अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहिले होते. अशा विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना पुन्हा शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी शिक्षण प्रसार व जनजागृती अभियानाचा एक भाग म्हणून शिक्षणदूत उपक्रम राबविण्यात आला. या शोध मोहिमेत आजी–माजी विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांना रात्रशाळेत प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. दरम्यान, मुंबई येथील मासुम संस्थेने केलेल्या सर्व्हेनुसार भाई सथ्था नाईट हायस्कूल ही सर्वाधिक विद्यार्थीसंख्या असलेली राज्यातील क्रमांक एकची शाळा ठरली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या पार्श्वभूमीवर हिंद सेवा मंडळाचे नूतन अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली विशेष गौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे उपस्थित होते. यावेळी भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, संस्थेचे उपाध्यक्ष व शालेय समिती सदस्य विलास बडवे, संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्राचार्य सुनील सुसरे आदींसह शालेय शिक्षक, आजी–माजी विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी शिक्षणदूत अभियानाची भूमिका स्पष्ट केली. अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागते. अशा विद्यार्थ्यांना राहिलेले शिक्षण रात्रशाळेत पूर्ण करण्याची संधी आणि प्रोत्साहन दिले जात आहे. भाई सथ्था नाईट हायस्कूलची राज्यातील सर्वात मोठी रात्रशाळा म्हणून ओळख निर्माण झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे म्हणाले, शिक्षण हा तिसरा डोळा असून, मनुष्याला विकासाची दृष्टी मिळते. शिक्षणातून चांगला माणूस घडतो. रात्रशाळेत काम करून शिक्षण घेणारे विद्यार्थी हे समाजासाठी प्रेरणादायी आहेत. आजच्या ऑनलाइनच्या युगातही वर्गातील प्रत्यक्ष शिक्षणाचे महत्त्व कमी झालेले नाही.

ॲड. अनंत फडणीस म्हणाले, राज्यात सर्वाधिक विद्यार्थी असल्याचा मान भाई सथ्था नाईट हायस्कूलने मिळवला आहे. शिक्षणदूत या उपक्रमातून अनेक गरजू घटक पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आले आहेत. बाहेरगावातून रात्रशाळेत शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्याचा प्रयत्न व्यवस्थापन समितीशी चर्चा करून केला जाणार आहे. मासुम संस्थेचे सहकार्य तसेच विविध कृतीशील उपक्रमांच्या माध्यमातून प्राचार्य सुनील सुसरे यांनी शाळेचे नाव राज्यात उंचावले असल्याचेही त्यांनी सांगितले.

अजित बोरा यांनीही भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या कार्याचे कौतुक केले. शिक्षणदूत अभियानांतर्गत सर्वाधिक विद्यार्थी प्रवेशित करण्याची स्पर्धा आजी–माजी विद्यार्थी गट तसेच शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी गट अशा दोन गटांत घेण्यात आली होती. यामध्ये शिक्षक गटातून प्रथम क्रमांक शिवप्रसाद शिंदे, द्वितीय क्रमांक शरद पवार, तर तृतीय क्रमांक अमोल कदम यांनी मिळविला. विद्यार्थी गटातून प्रथम क्रमांक माई फाजगे–खरे व प्रदीप भोसले, द्वितीय क्रमांक ज्योती गायकवाड (पगारे), अनिल दिवे, आरती लबडे (गावडे) शितल पन्हाळे (घोडके), तर तृतीय क्रमांक दीपक वाघमारे यांनी मिळविला. सर्व विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे उपाध्यक्ष व शालेय समिती सदस्य विलास बडवे यांनी शिक्षणदूत अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकाच्या विजेत्यांना रोख बक्षिसे देऊन प्रोत्साहन दिले.

हिंद सेवा मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. अनंत फडणीस यांची नुकतीच नियुक्ती झाल्याबद्दल रात्रशाळेच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात रात्रशाळेत शिक्षण घेणाऱ्या त्रिशला सरवदे, माई फाजगे, सारिका गुजेट्टी, अमित भोज, अनिल दिवे या विद्यार्थ्यांनी आपले अनुभवही व्यक्त केले. महादेव राऊत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. स्वागत प्राचार्य सुनील सुसरे यांनी केले. सूत्रसंचालन वृषाली साताळकर यांनी केले. आभार मंगेश भुते यांनी मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## हवे समाधान

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स


डॉ. मधुकर अष्टीकर लिखीत — प्राजक्त ९८९०९५६६९५

वीज चमकली. क्षणभरच टिकली. लख्ख प्रकाशाने धरती न्हाउन निघाली. पाठोपाठ तिने केवढी गर्जना केली ? मंडळी दचकली । विद्युल्लतेची केवढी प्रसिद्धी झाली. पण ही विजेची कीर्ती क्षणजीवी ठरली सगळी जनता तिला क्षणातच विसरली. कुठल्या मार्गाने गेली ? झाडे पाडली नव्हे जाळली. माणसे मारली । तरी ती नावारुपाला नाही आली। लोकांच्या का ती सदैव आठवणीत राहिली? तिच्या कीर्तीवर का प्रजा भाळली ?

रविचंद्रांची स्मृती, मात्र सदैव जागती. त्यांचे प्रात:काळापासून लोक स्तुतिस्त्रोत्र गाती. त्यांची कीर्ती चिरंजीवी । पण तसे कशापायी ? सूर्य एकदा तळपला, चंद्र एकदा चमकला आणि सदासर्वकाळ लोकांच्या स्मरणात राहिला ? नाही, सुर्य रोज प्रकाश देतो व मावळतो. रात्रीच आपण त्याला विसरतो. सुर्यदेखील हे ओळखतो आणि पुन्हा सकाळी उगवतो । रोज उगवायचे रोज लोकांचे जीवन उजळून काढायचे । मगच अक्षय कीर्तीचे धनी व्हायचे।

माणसा, तुलाही हवी असते कीर्ती पण ती कीर्ती तिला नसते मिती । ती आज मिळाली की उद्या संपली. कीर्ती टिकावी तर रोज ती कृती गिरवावी. पण कीर्तीच्या मागे लागून सगळी शक्तीस्फूर्ती उर्मी वाया घालवायची? कीर्ती हे साधन, एक प्रकारचे चलनी धन, साध्यांवर नको का लावायला मन ? शेवटी साधनापेक्षा साध्यच मोलाचे । त्यासाठीच साधन वापरायचे। साधनापाशीच नाही थांबायचे।

साधनानामनेकचा असे म्हणून शहाणे म्हणतात. कारण साधने अनेक असू शकतात. साध्याबाबत का मतभेद उरतात ? मग कीर्ती हवी कशाला ? त्याचा कधी विचार केला?

समर्थ रामदास म्हणतात, ज्याचे मन समाधानी, तोच सदासर्वदा कीर्तीचा धनी. साधन नव्हे तर ध्येय असावे सदा मनी. उन्हाने जमीन तापली. पायांना चटके देउ लागली. आता पाय पोळू नयेत एवढे पाहायचे। पण त्यासाठी सगळ्या तापलेल्या जमिनीला का चामडे पांघरायचे? हे अशक्य आणि हास्यास्पद ठरायचे। पायाला बसणारे चटके टाळायला पायापुरते चामडे पुरे व्हायचे।

जग जिंकणारा अलेक्झांडर आणि एक विख्यात संत डायजेनीस यांची कथा आहे. अलेक्झांडर सगळ्या जगाचा धनी. पण मनात सदा असमाधानी। जग जिंकले कशासाठी? त्याचा कधी विचारच केला नाही त्याने ? एकदा तो डायजेनीसकडे गेला. संत डायनेजीस उन्हं खात मोकळ्या जागी बसला होता. सभोवारची झाडे टाळून बसला होता.

अलेक्झांडर त्याच्यापुढे उभा राहिला. एवढा मोठा जगज्ञेता समोर उभा । पण डायजेनीसच्या दृष्टीनं तो मूर्ख होता. कारण जग जिंकले कशासाठी ? आनंद, शांती व समाधान मिळविण्यासाठीच ना? मग या साध्यासाठी काय जिंकायचे ते नाही का विचारपूर्वक ठरवायचे? जग नव्हे, तर स्वत:लाच जिंकायचे। पण अलेक्झांडरसारख्यांना का ते समजायचे? म्हणूनच डायजेनीसला वाटले त्याचे का स्वागत करायचे ?

अलेक्झांडर समोर उभा होताच. डायजेनीसचे उन अडले । त्याच्याजवळ नेहमी एक कुत्रा बसलेला असे. त्याच्याशीच डायनेजीस नेहमी बोले। डायजेनीसने अलेक्झांडरची दखलच घेतली नाही. फक्त कुत्र्याला म्हटले, अरे उन अडले ? आजच कसे आनंदात विघ्न आले?

अलेक्झांडर म्हणाला, तोडून टाकली भोवतालची झाडे की रान होईल मोकळे. उन्हे खाता येतील तुम्हाला मग हवी तेवढी बोला?

डायजेनीस म्हणाला, अडलेल्या उन्हासाठी झाडे नकोत तोडायला. तूच हो तेवढा बाजूला. जगज्ञेता अलेक्झांडर चपापला. बाजूला झाला, पण त्यांपासून काही शिकलो? छे. असमाधानातच मेला ।

– किशोर गांधी

# ज्ञानसरिता विद्यालयात किशोरवयीन आरोग्य जनजागृती कार्यक्रम



नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंगच्या समुदाय आरोग्य परिचर्या विभागाच्या वतीने, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या सहकार्याने वडगाव गुप्ता येथील ज्ञानसरिता विद्यालयात शालेय आरोग्य तपासणी व किशोरवयीन आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व समजावून देणे, वैयक्तिक स्वच्छता, योग्य पोषण, निरोगी जीवनशैली तसेच किशोरवयीन आरोग्याबाबत योग्य माहिती देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची सर्वसमावेशक आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आढळलेल्या सामान्य आरोग्य समस्या तसेच किशोरवयीन वयातील आरोग्यविषयक अडचणींबाबत विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले. यावेळी विविध आरोग्यविषयक विषयांवर पोस्टर प्रदर्शन, प्रात्यक्षिके आणि जनजागृतीपर स्किट सादर करण्यात आले. मासिक पाळीचे आरोग्य व व्यवस्थापन, गुड टच–बॅड टच, स्व–स्तन तपासणी व लवकर निदानाचे महत्त्व, तोंडाचा व गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग प्रतिबंध व तपासणी, योग्य पोषण, वैयक्तिक स्वच्छता, निरोगी जीवनशैली आणि किशोरवयीन मुलींमध्ये आढळणाऱ्या सामान्य आरोग्य समस्यांबाबत विद्यार्थ्यांना सोप्या व प्रभावी पद्धतीने माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे अध्यक्ष अमर गुरव आणि सुनील कटारिया यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी संचालक (मेडिकल) प्रा. डॉ. अभिजित दिवटे, तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश मोरे यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अपूर्वा देशमुख आणि बालरोगतज्ज्ञ डॉ. ऐश्वर्या तळवलकर यांनी विशेष सहकार्य केले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. प्रतिभा चांदेकर, प्राचार्य तसेच प्रा. डॉ. योगिता औताडे, उपप्राचार्य व विभागप्रमुख, समुदाय आरोग्य परिचर्या विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी शाळेचे प्राचार्य सुंबे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी अमोल अनप, दिनेश मगर, प्रिती कडू आणि स्नेहल घोडेकर यांनी समन्वय साधला.


हॉटेल न्यू रणजित फॅमिली गार्डनला आ. अक्षय कर्डिले यांनी भेट दिली. याप्रसंगी त्यांचा सत्कार करताना संचालक रोहित भुजबळ, सागर बनकर, यशवंत पानमळकर.

# रोटरी प्रियदर्शनी व क्लासिक व्हील आयोजित स्पर्धेत विद्यार्थ्यांचा देशभक्तीचा जागर


शालेय देशभक्ती गीत स्पर्धेचे उद्घाटन करताना उद्योजक सुनील मुनोत. समवेत प्रभा खंडेलवाल, सुरेखा मणियार, छाया फिरोदिया, अनुजा कुलकर्णी व पवन नाईक आदी.

नगर – भारतीय स्वातंत्र्यांच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी व क्लासिक व्हील्स कंपनीच्या संयुक्त विद्यमाने शालेय देशभक्ती गीत स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत देशभक्तीपर गीतांचे गायन करुन देशभक्तीचे स्फुल्लिंग चेतविले.

स्पर्धेचे उद्घाटन क्लासिक व्हील्स कंपनीचे संचालक उद्योजक सुनील मुनोत यांच्या हस्ते भारत माता प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करुन करण्यात आले. यावेळी गायक पवन नाईक, डॉ. जिज्ञासा मुनोत, मंजू मुनोत,रोटरी क्लब प्रियदर्शनीच्या अध्यक्षा प्रभा खंडेलवाल, सेक्रेटरी सुरेखा मणियार, छाया फिरोदिया, देविका रेळे, माधुरी सारडा, आरती लोहाडे, आर्किटेक इंजिनियर मीनल काळे यांच्यासह रोटरी क्लबच्या सदस्या, सहभगी विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

यावेळी उद्योजक मुनोत म्हणाले, भारतात नुकताच स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. भारत आज सर्वांगीण प्रगती करत असून जगात सर्वत्र देशाची प्रतिष्ठा वाढली आहे. नव्या पिढीने भविष्यात देशाची धुरा सांभाळत आपल्या वैभवशाली देशाचा अभिमान बाळगून कायम आदर करावा. क्लासिक व्हील्स व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीने आयोजित केलेल्या देशभक्तीपर गीत स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्तीचे स्फुल्लिंग जागृत झाले आहे. नव्या पिढीने कायम अशीच देशभक्ती मनात जागृत ठेवावी राष्ट्राप्रती योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

स्पर्धेत शहरातील विविध शाळांमधील इयत्ता पाचवी ते दहावी मधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. दिवसभर चाललेल्या या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी देशभक्तीपर गीतांमधून देशभक्तीचा जागर केला.

प्रास्ताविकात प्रभा खंडेलवाल म्हणाल्या, रोटरी क्लब प्रियदर्शनीच्या वतीने घेण्यात आलेल्या देशभक्तीपर गीत स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. विद्यार्थ्यांसाठी चांगले व्यासपीठ उपलब्ध व्हावे व त्यांच्यात देशभक्ती जागृत व्हावी या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता काळे व विभा तांबडे यांनी केले. क्लबच्या सचिव सुरेखा मणियार यांनी आभार मानले.

स्पर्धेत रेणावीकर प्राथमिक शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. तर नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलने द्वितीय क्रमांक पटकावला. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलने तृतीय क्रमांक पटकावला. सॅक्रेड हार्ट स्कूल, पंडित नेहरू विद्यालय व अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल यांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्रदान करण्यात आली. विशेष वाद्य वादक रुद्र पवार, सुजल गावडे, अरण पंडित व शौर्य थोरात यांना तर उत्कृष्ट वाद्य वृंद म्हणून आठरे पाटील पब्लिक स्कूल गौरव करण्यात आला. परीक्षण अनुजा कुलकर्णी व पवन नाईक यांनी केले. स्पर्धेसाठी क्लासिक व्हील्स कंपनीचे प्रायोजकत्व लाभले.


पोलीस बांधवांना ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलमधील विद्यार्थिनींनी राख्या बांधत अनोखा रक्षाबंधन सण साजरा केला.

# 'ऑक्झिलियम'च्या विद्यार्थिनींनी पोलिसांना बांधल्या राख्या

नगर – भाऊ–बहिणीच्या प्रेमाचे, जिव्हाळ्याचे आणि विश्वासाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण तोफखाना पोलीस ठाण्यात आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलमधील ऑक्झिलियम युवा चळवळीच्या २२ विद्यार्थिनींनी तोफखाना पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस बांधवांना राखी बांधत रक्षाबंधन साजरे केले.

विद्यार्थिनींसोबत प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सिस्टर रेश्मा, शिक्षिका रिया, सिस्टर बेट्सी , शिक्षिका नम्रता तसेच शिक्षक मयूर उपस्थित होते. पोलीस कर्मचारी समाजात कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सातत्याने कार्यरत असतात. सण–उत्सवांच्या काळात नागरिक आपल्या कुटुंबीयांसोबत आनंद साजरा करत असताना पोलीस कर्मचारी मात्र आपले कर्तव्य बजावत असतात. अशा कर्तव्यनिष्ठ पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधन साजरे करून विद्यार्थिनींनी त्यांच्या कार्याचा सन्मान केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्याची आणि समाजाप्रती असलेल्या जबाबदारीची जवळून ओळख झाली. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस यंत्रणा बजावत असलेली भूमिका विद्यार्थिनींना समजून घेता आली. त्याचबरोबर समाजातील विविध घटकांप्रती आदर, संवेदनशीलता आणि कृतज्ञतेची भावना जपण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.आनंद, प्रेम, आपुलकी आणि कृतज्ञतेच्या भावनेने पार पडलेला हा रक्षाबंधन उत्सव विद्यार्थिनी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांसाठी संस्मरणीय ठरला.

# निसर्गाचा सन्मान, शाडू मातीचा मोरया! स्नेहबंध फौंडेशनच्या पोस्टरचे अनावरण


शाडू मातीचा मोरया जनजागृती पोस्टरचे अनावरण करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मनपा आयुक्त यशवंत डांगे व डॉ. उद्धव शिंदे.

नगर – आगामी गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा आणि जलप्रदूषणाला आळा बसावा, या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे शाडू मातीचा मोरया या विशेष जनजागृती अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. निसर्गाचा सन्मान, शाडू मातीचा मोरया! घरातच विसर्जन, हाच खरा उत्सव साजरा! हा संदेश देणाऱ्या जनजागृती पोस्टरचे अनावरण जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, गणेशोत्सव हा श्रद्धा आणि आनंदाचा सण आहे. मात्र, उत्सव साजरा करताना पर्यावरणाचे भान ठेवणेही तितकेच गरजेचे आहे. नागरिकांनी शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा वापर करावा आणि शक्यतो घरच्या घरीच विसर्जन करावे. स्नेहबंध फौंडेशनचा हा उपक्रम नक्कीच प्रेरणादायी आहे.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही आज काळाची गरज बनली आहे. नागरिकांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींचा वापर पूर्णपणे टाळून शाडू मातीच्या मूर्तींना प्राधान्य द्यावे. घरातच विसर्जन करून जलप्रदूषण रोखण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे. शाडू मातीच्या मूर्तींच्या वापरासाठी शहरात जनजागृती मोहीम राबवणे, जलप्रदूषण टाळण्यासाठी घरच्या घरीच बादली किंवा कुंडीत विसर्जन करण्याचे आवाहन, फौंडेशनच्या वतीने गणेशोत्सवादरम्यान विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन अशा या उपक्रमाचे वैशिष्ट्ये आहे.

गणरायाची भक्ती करताना निसर्गाचे रक्षण झालेच पाहिजे. शाडू मातीची मूर्ती आणि घरच्या घरी विसर्जन हा पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी मार्ग आहे. 'शाडू मातीचा मोरया' या अभियानात सहभागी होऊन नागरिकांनी पर्यावरण रक्षणाचा संकल्प करावा, असे डॉ. उद्धव शिंदे यांनी सांगितले.

# विखे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये आपत्ती प्रात्यक्षिक सरावाचे आयोजन


विखे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये आपत्ती प्रात्यक्षिक करण्यात आले.

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर येथे समुदाय आरोग्य परिचर्या विभागाच्या वतीने बी.एस्सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठी अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक सराव आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच आपत्कालीन परिस्थिती आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या प्रात्यक्षिक सरावामुळे विद्यार्थ्यांना आगीसारख्या आपत्कालीन परिस्थितीत तत्परतेने, प्रभावीपणे आणि सुरक्षितपणे प्रतिसाद देण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांची आपत्कालीन परिस्थितीतील तयारी, आत्मविश्वास आणि व्यावसायिक क्षमता वाढविण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थिती कोणत्याही वेळी उद्‌भवू शकते. अशा वेळी रुग्णांची सुरक्षितता सुनिश्चित करणे, तातडीने प्राथमिक उपचार देणे, सुरक्षित स्थलांतर करणे, आपत्कालीन पथकांशी समन्वय साधणे आणि आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे, यामध्ये परिचारिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीवर आधारित प्रशिक्षण देण्यात आले.

प्रात्यक्षिक सरावादरम्यान विद्यार्थ्यांना अग्निसुरक्षेची मूलभूत तत्त्वे, आपत्कालीन प्रतिसाद, सुरक्षित स्थलांतर प्रक्रिया आणि आपत्ती व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने अलार्म देणे, संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देणे, नागरिक व रुग्णांचे सुरक्षित स्थलांतर करणे, घाबरून न जाता शांतपणे परिस्थिती हाताळणे आणि बाधित व्यक्तींना तातडीने प्राथमिक उपचार देणे, याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यात आले.

या मॉक ड्रिलमध्ये बाधित व्यक्तींना रुग्णवाहिकेद्वारे सुरक्षितपणे रुग्णालयात हलविणे आणि रुग्णालयात आवश्यक आपत्कालीन उपचार उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेचाही समावेश करण्यात आला. सुरुवातीच्या आपत्कालीन प्रतिसादापासून सुरक्षित स्थलांतर, रुग्णवाहिकेद्वारे वाहतूक आणि आपत्कालीन वैद्यकीय उपचारापर्यंतच्या विविध टप्प्यांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार तसेच विविध विभागांमधील प्रभावी समन्वयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजले. विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिक सरावात उत्स्फूर्त सहभाग घेत आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित विविध कौशल्यांचे प्रदर्शन केले. या उपक्रमातून संघभावना, प्रभावी संवाद, नेतृत्वगुण, तत्पर निर्णयक्षमता तसेच आरोग्यसेवा कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी आणि सहाय्यक पथकांमधील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित झाले.

या प्रात्यक्षिकासाठी वैद्यकीय संचालक प्रा. डॉ. अभिजित दिवटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश मोरे, कॅज्युअल्टी ऑफिसर डॉ. मयुरी वाळुंज आणि सुरक्षा अधिकारी आंबोरे यांचे सहकार्य व मोलाच्या योगदानाबद्दल विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

हा कार्यक्रम प्राचार्य प्रा. डॉ. प्रतिभा चांदेकर, आणि उपप्राचार्य प्रा. डॉ. योगिता औताडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला. अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिकाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अमोल टेमकर, प्रा. अमित कडू, सहयोगी प्राध्यापक निलेश म्हस्के, राहुल कडू, विशाल पुलाटे आणि प्रशांत अम्ब्रीत यांनी मॉक ड्रिलचे प्रभावी समन्वय व आयोजन केले.

# श्रावणधारा जिल्हास्तरीय काव्यसंमेलन उत्साहात

### चांदबिबी महाल परिसरात बहारदार कवितांचे सादरीकरण

नगर – महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने चांदबिबी महाल परिसरात जिल्हास्तरीय श्रावणधारा काव्यसंमेलन घेण्यात आले. निसर्गरम्य वातावरणात झालेल्या या काव्यसंमेलनास जिल्हाभरातील कवी, साहित्यिक व रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक कवींनी यावेळी आपल्या बहारदार कवितांचे सादरीकरण केले.



जिल्हास्तरीय श्रावणधारा काव्यसंमेलनात सुनील गोसावी, शर्मिला गोसावी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास नवनिर्वाचित अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, इतिहासतज्ज्ञ प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ, मसाप शाखा अहिल्यानगरचे अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, काव्यसंमेलन संयोजक राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष राजेंद्र चोभे, प्राचार्य विश्वासराव काळे, प्रा. रवींद्र देवडे, सहकार्यवाह शिवाजी साबळे, उपाध्यक्ष डॉ. श्याम शिंदे, प्रा. रवींद्र काळे, शब्दगंध साहित्यिक परिषदेचे संस्थापक सुनील गोसावी, कवयित्री शर्मिला गोसावी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा अहिल्यानगरची धुरा नवनिर्वाचित अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे यांनी स्वीकारल्यानंतर नव्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील साहित्य चळवळीला निश्चितच नवसंजीवनी मिळेल. साहित्य परिषदेमार्फत वर्षभर विविध साहित्यिक उपक्रमांचे नियोजन करून अधिकाधिक साहित्यिक व सभासदांना व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे, असे ज्येष्ठ कवी प्रकाश घोडके यांनी यावेळी सांगितले.

इतिहासतज्ज्ञ प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ यांनी चांदबिबी महाल आणि परिसराचा ऐतिहासिक वारसा, त्याचे महत्त्व तसेच या परिसराशी निगडित ऐतिहासिक घटनांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. ऐतिहासिक आणि निसर्गरम्य वातावरणात रंगलेल्या काव्यसंमेलनामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

मसापचे अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे यांनी आपल्या मनोगतापूर्वी एक हृदयस्पर्शी कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. साहित्यिकांनी एकदिलाने एकत्र येऊन साहित्यिक उपक्रम राबविल्यास जिल्ह्यातील साहित्य चळवळीला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त होईल, असे त्यांनी सांगितले.

कवयित्री शर्मिला गोसावी यांनी सूत्रसंचालन केलेल्या काव्यसंमेलनात डॉ. रमेश वाघमारे, सुभाष सोनवणे, स्वाती ठुबे, रामदास कोतकर, सचिन चव्हाण, कानवडे महाराज, बाळासाहेब मंतोडे, राहुल शिंदे, शर्मिला रणधीर, प्रा. बबनराव गिरी, नजमा शेख, सुरेखा घोलप, प्रा. डॉ. अनिल गर्जे, बाळासाहेब शेंदुरकर, बाळासाहेब देशमुख, स्वाती काळे, एम. पी. दिवाण, प्रा. रवींद्र काळे, शाहीर वसंत डंबाळे, प्रतिभा बोबे, निरु जगताप, आदित्य गोरे, शिवाजी साळवे, रज्जाक शेख, आनंदा साळवे, सुनील गोसावी यांच्यासह अनेक कवींनी आपल्या विविधांगी रचना सादर केल्या.

कार्यक्रमास चित्रकार प्रा. रवींद्र सातपुते, नवजीवन प्रतिष्ठानचे राजेंद्र पवार, अथर्व थोरात, सत्यप्रेम गिरी, वॉरियर्स फाउंडेशनच्या संगीता गिरी, आरती गिरी, सागर पवार, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, मकरंद घोडके उपस्थित होते. काव्यसंमेलनात सहभागी झालेल्या कवींचा शाल, पुस्तक व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी राजेंद्र उदागे, प्रा. रवींद्र देवडे, राजेंद्र चोभे, शिवाजी साबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.


साईसूर्य नेत्रसेवेच्या वतीने जालिंदर बोरुडे यांना नेत्र गौरव पुरस्काराने सन्मानित करताना शिरीष रायते, डॉ. रावसाहेब बोरुडे, डॉ. राजीव चिटगोपीकर, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया आदी.

# नेत्र गौरव पुरस्काराने जालिंदर बोरुडे सन्मानित

नगर – नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांना साईसूर्य नेत्रसेवेच्या वतीने नेत्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून ३४ वर्षांपासून बोरुडे सातत्याने नेत्रसेवा, मोफत नेत्रशिबिरे, मोतिबिंदू शस्त्रक्रिया तसेच मरणोत्तर नेत्रदानाबाबत जनजागृतीचे कार्य करत आहेत. त्यांच्या या निस्वार्थ सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास शिरीष रायते, डॉ. रावसाहेब बोरुडे, डॉ. राजीव चिटगोपीकर, साई सूर्य नेत्रसेवेचे डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया उपस्थित होते. बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील गरजू नागरिकांपर्यंत नेत्रसेवेचा लाभपोहोचविण्याचे काम केले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेणे शक्य नसलेल्या अनेक रुग्णांसाठी त्यांनी विविध ठिकाणी नेत्र तपासणी व उपचार शिबिरांचे आयोजन केले.

या शिबिरांच्या माध्यमातून गरजू रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांसह गरजू रुग्णांना पुन्हा स्पष्टपणे पाहता आले.


मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने श्रावण सोमवार निमित्त निसर्गसृष्टी गोपालन संस्था, निंबळक येथे गोशाळेत चारा वाटप करण्यात आले. यावेळी ईश्वर पवार, स्वामी टाकळकर, शुभम टाकळकर, हिमांशू साखला, अंकुश गोयल, सागर शर्मा, संस्थेचे सुरेंद्र सोनवणे आदी उपस्थित होते.

# वर्षानुवर्षे रखडलेल्या वंजार गल्लीतील रस्त्याला अखेर मुहूर्त

### नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या प्रयत्नातून कॉंक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात

नगर – शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील वंजार गल्ली परिसरातील वर्षानुवर्षे रखडलेल्या रस्त्याच्या प्रश्नाला अखेर गती मिळाली आहे. नागरिकांच्या दैनंदिन अडचणींचा विचार करून नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या प्रयत्नातून या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते या कामाचे उद्घाटन करण्यात आले. रस्त्याचे काम सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

वंजार गल्ली परिसरातील रस्त्याची अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली होती. रस्त्याच्या समस्येमुळे नागरिकांना दैनंदिन ये–जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात रस्त्याची अवस्था अधिक बिकट होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर रस्त्याचे कॉंक्रिटीकरण व्हावे, अशी नागरिकांची मागणी होती. नगरसेवक सागर मुर्तडकर यांनी या प्रश्नाचा पाठपुरावा करून अखेर रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.


प्रभाग क्रमांक १० मधील वंजार गल्ली परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन करताना भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते समवेत उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक सागर मुर्तडकर, नगरसेविका मयुरीताई जाधव, नगरसेविका शीतलताई ढोणे व पदाधिकारी.

या कामाच्या उद्घाटन सोहळ्यास उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक सागर मुर्तडकर, नगरसेविका मयुरीताई जाधव, नगरसेविका शीतलताई ढोणे, संजय ढोणे, भाजप नेते बाबासाहेब सानप, सूरज जाधव, कुस्ती संघटनेचे वैभव लांडगे, श्रीकांत फंड, निलेश खांडरे, शुभम गंगेकर, सचिन दिवटे, ज्ञानेश्वर ढापसे, जगन्नाथ शेट बजाज, बिहानी शेठ, भाजपचे ज्येष्ठ नेते अनिल गट्टानी, गणेश शेठ कांबळे, शरद मुर्तडकर, विनाताई ढापसे, उमेश काळे, गणेश भाऊ भिंगारदिवे, हरिभाऊ जुम्मेवाले यांच्यासह प्रभागातील अनेक मान्यवर, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, प्रभाग क्रमांक १० मध्ये भाजपचे तीन नगरसेवक बहुमताने निवडून आल्यानंतर परिसरातील विकासकामांना वेग आला आहे. वंजार गल्लीसह प्रभागातील अनेक भागांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून विविध विकासकामे प्रलंबित होती. मात्र, सागर मुर्तडकर नगरसेवक झाल्यानंतर नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले आहेत. असे ते म्हणाले.

# नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पिटिशनमध्ये आदित गोरे द्वितीय

नगर – पुणे येथे आयोजित नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पिटिशन मध्ये चि. आदित केतन गोरे याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. महाराष्ट्र अबॅकस टीचर असोसिएशन तर्फे आयोजित या नॅशनल लेवल कॉम्पिटिशन मध्ये भारतातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.



चि. आदित केतन गोरे यांन या नॅशनल लेवल कॉम्पिटिशन मध्ये १० मिनिटात १९० गणिते सोडवून द्वितीय क्रमांकाची ट्रॉफी पटकावल्याने त्याचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. या यशासाठी त्याला शिक्षिका सौ ढेपे तसेच पालक दंततज्ञ डॉ केतन गोरे व डॉ. अंजली गोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

# दि अंबिका महिला सहकारी बँकेस सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार-२०२६ जाहीर

नगर – दि अंबिका महिला सहकारी बँकेस बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक फेडरेशन लि., मुंबई यांचा महाराष्ट्र राज्यातील महिला बँक गटातून सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२५–२६ नुकताच जाहिर झालेला आहे, अशी माहिती बँकेच्या अध्यक्षा सौ. शांता भिमराज मोरे यांनी दिली. त्या पुढे म्हणाल्या की, बँकेस आत्तापर्यंत राज्यस्तरीय एकूण तेरा व नॅशनल पातळीवरील एक असे एकूण चौदा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार मिळालेले आहेत. या पुरस्काराने बँकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा लागला आहे. याचा आम्हास अभिमान आहे. त्याचबरोबर चांगल्या कामगिरीचे सातत्य राखण्याची जबाबदारी ही वाढली आहे. सदर पुरस्कार बँकेच्या सभासद, ग्राहकास समर्पित करते.


मेधा काळे


शांता मोरे


सुमन गोसावी

बँकेच्या संस्थापिका प्रा. मेधाताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेचा एकूण व्यवसाय रू.२२५.१८ कोटीहून अधिक आहे. सी आर ए आर. २१.०१%, नक्त एन. पी. ए. ०.०%, नियमित लेखापरिक्षण वर्ग अ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे सर्व निकष पूर्ण करत आहे. सभासदांना मागील अनेक वर्ष १३ % लाभांश देणारी जिल्ह्यातील एकमेव महिला बँक आहे. बँकेने ग्राहकांसाठी मोबाईल बँकींग, फोन पे, गुगल पे, यु.पी.आय., ए.टी.एम. व अन्य डिजिटल सेवा सुरू केलेली आहे. ठेवी वरील व्याजदर ७.९०% करण्यात आला असून कर्जावरील व्याजदर संतुलित केलेले आहे. सोनेतारण कर्जाची मर्यादा वाढवली असून याचा ग्राहकांनी लाभ घ्यावा असे अवाहन बँकेच्या उपाध्यक्षा सौ. सुमन गणेश गोसावी यांनी केले.

सन २०२५–२०२६ या पुरस्कार प्राप्त आर्थिक वर्षाचे बँकेच्या अध्यक्षा म्हणून सौ. सरोजिनी चव्हाण तर उपाध्यक्षा म्हणून ॲड.सौ.विजया काकडे यांनी कामकाज पाहिले. मुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड हे व्यवस्थापकीय पदाची जबाबदारी सांभाळतात.

बँकेच्या संस्थापक संचालिका प्रा. डॉ. सौ. संध्या जाधव, सौ. आशा मिस्किन, सौ. भारती आठरे, ॲड. सौ. शारदा लगड, सौ. शोभना चव्हाण, सौ. शोभा खरपुडे, तज्ञ संचालक सी. ए. ज्ञानेश्वर काळे, दिवंगत सौ. सविता गांगर्डे, तज्ञ संचालक रमेश परभाणे, सेवक संचालक सुभाष म्हस्के, निलेश जगताप, उपमुख्याधिकारी सौ. रोहिणी शेळके, कर्मचारी वृंद यांचा ही या पुरस्कारात मोलाचा वाटा आहे.

# धनादेश अनादर प्रकरणात व्यावसायिकास १ वर्षाचा कारावास

### ४९ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश

नगर – धनादेश अनादर प्रकरणात अहमदनगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी न्यायालयाने प्रवीण जगन्नाथ रासकर यांना दोषी ठरवत एक वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच तक्रारदार महात्मा फुले मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीला ४९ लाख रुपये नुकसानभरपाई ३० दिवसांच्या आत अदा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. हा निकाल २८ ऑगस्ट २०२६ रोजी देण्यात आला.

या प्रकरणात आरोपीने व्यवसाय विस्तारासाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीकरिता ४९ लाख रुपयांचा धनादेश दिला होता. सदर धनादेश अपुऱ्या निधीअभावी अनादरित झाल्यानंतर संस्थेने कायदेशीर नोटीस बजावून न्यायालयात तक्रार दाखल केली होती. न्यायालयाने तक्रारदाराने सादर केलेले धनादेश, बँक मेमो, खाते उतारे, कर्जविषयक कागदपत्रे तसेच साक्षीदारांची साक्ष विचारात घेतली. आरोपीने धनादेश हा सुरक्षा धनादेश म्हणून दिला होता व त्याचा गैरवापर झाल्याचा बचाव घेतला; मात्र हा बचाव सिद्ध करण्यासाठी पुरेसा संभाव्य पुरावा सादर करण्यात आरोपी अपयशी ठरल्याचे न्यायालयाने नमूद केले. धनादेशावर आरोपीची स्वाक्षरी असल्याचे मान्य असल्याने तसेच कायदेशीर देयतेच्या संदर्भातील वैधानिक अनुमान आरोपीने खोडून काढले नसल्याने न्यायालयाने Negotiable Instruments Act, १८८१ मधील कलम १३८ अन्वये दोषी ठरविले.

अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी महेश आर. देवकाते, न्यायालय क्र. १४, अहमदनगर यांनी आरोपीस एक वर्षाचा साधा कारावास व ४९ लाख रुपये नुकसानभरपाई ३० दिवसांत तक्रारदार संस्थेस देण्याचा आदेश दिला.

तक्रारदार संस्थेतर्फे अधिकृत प्रतिनिधी राहुल अशोक बनकर आणि आकांक्षा नितीन बडदे यांनी तक्रार दाखल केली असून, संस्थेच्या वतीने अड. व्ही. बी. तोडमल यांनी काम पाहिले.


शिफा शेख हिचा सत्कार करताना आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे संचालक व प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील व इतर शिक्षक.

# आडसूळ टेक्निकल कॅम्पसची विद्यार्थिनी शिफा शेख हिची ॲमेझॉन कंपनीत निवड

नगर – चास येथील आडसूळ टेक्निकल कॅम्पसची विद्यार्थिनी शिफा शेख हिने आपल्या गुणवत्तेची आणि तांत्रिक कौशल्याची प्रभावी छाप पाडत ॲमेझॉन या नामांकित कंपनीत कॅम्पस प्लेसमेंटद्वारे नोकरी मिळवली आहे. शिफा शेख हिला कंपनीकडून वार्षिक ४ लाख रुपयांचे पॅकेज मिळाले असून, तिच्या या उल्लेखनीय यशामुळे आडसूळ टेक्निकल कॅम्पसच्या शैक्षणिक व प्लेसमेंट क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

संचालक व प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील यांनी शिफा शेख हिचे विशेष अभिनंदन केले. ते म्हणाले, विद्यार्थ्यांच्या मेहनतीला योग्य दिशा, कौशल्यविकासाला योग्य व्यासपीठ आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण मिळाल्यास ते निश्चितच यशाची उंची गाठू शकतात. शिफा शेख हिने मिळवलेले यश हे तिच्या मेहनतीचे आणि आत्मविश्वासाचे फलित आहे. तिच्या यशाचा इतर विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा.

या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना शिफा शेख म्हणाली, आडसूळ टेक्निकल कॅम्पसमध्ये घेतलेल्या शिक्षणामुळे माझ्या करिअरला योग्य दिशा मिळाली. ॲमेझॉनसारख्या नामांकित कंपनीत निवड होणे आणि वार्षिक ४ लाख रुपयांचे पॅकेज मिळणे, ही माझ्यासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. या यशामागे माझ्या आई–वडिलांचे प्रोत्साहन, कुटुंबीयांचा पाठिंबा तसेच आडसूळ टेक्निकल कॅम्पसमधील प्राचार्य, शिक्षक आणि प्लेसमेंट विभागाचे मार्गदर्शन यांचा मोठा वाटा आहे.

शिफा शेख हिच्या या यशाबद्दल आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध आडसूळ, सचिव प्रा. लीना आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, सदस्या डॉ. कल्पना आडसूळ, सौ. रत्ना आडसूळ आणि सौ. पायल आडसूळ, संचालक व प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील, डॉ. संभाजी पठारे, डॉ. रमेश गडाख, डॉ. प्रदीप पंडित, डॉ. धनंजय लांडगे, डॉ. संदेश वायाळ, डॉ. रियाज बेग तसेच सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# ‘तिरंगा केवळ कार्यालयावर नको, अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीत उतरवा’

### पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

नगर – नागरिकांच्या करातून वेतन घेऊनही जनतेची कामे वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवणाऱ्या, कायद्याच्या राज्याऐवजी मनमानीला प्राधान्य देणाऱ्या आणि निर्णयांची जबाबदारी टाळणाऱ्या प्रशासकीय प्रवृत्तीविरोधात पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान अनेक वर्षांपासून रखडलेल्या नगर–मनमाड महामार्गाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी या महामार्गाला प्रतीकात्मक स्वरूपात ‘नितीन गडकरी अनागोंदी (नगर–मनमाड) राष्ट्रीय महामार्ग’ असे नामकरण करण्यात आले.



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करताना ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीर बहादूर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, बाळासाहेब पालवे, हनुमंतराव साळवे, आनंदा आढाव, अभिमान शिंदे, चतुराबाई शिंदे, रमेश भोसले आदी.

कर्तव्यनिष्ठा, शिस्त, निर्णयक्षमता आणि लोकाभिमुख प्रशासनाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कार्यशैलीचा आदर्श प्रशासनासमोर ठेवत त्यांच्या कर्तव्यनिष्ठेला प्रतीकात्मक ‘तिरंगा राष्ट्रीय धारणालय सलाम’ अर्पण करण्यात आला. प्रशासनातील प्रत्येक पद हे अधिकार गाजविण्याचे सिंहासन नसून जनतेच्या सेवेसाठी असलेले उत्तरदायी साधन आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

आंदोलनादरम्यान नागरिकांच्या मनगटावर तिरंगी राखी बांधून संविधाननिष्ठेचा संदेश देण्यात आला. तसेच ‘चाय पे विकासाची’ आणि धर्मनिरपेक्षतेची चर्चा करत संसदीय लोकशाही अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. ‘वंदे मातरम्’ची दोन कडवी गाऊन सर्वसमावेशक राष्ट्रीय भावनेचे पुनर्स्थापन करण्याचे आवाहनही करण्यात आले. यावेळी सौ. मिरा भगवान आव्हाड यांचा अहिल्यानगरच्या ‘अन्नपूर्णा आजी’ म्हणून संघटनेच्या वतीने सन्मान करण्यात आला. भारतीय प्रशासनातील प्रत्येक अधिकारी भ्रष्ट किंवा अकार्यक्षम नाही. अनेक अधिकारी प्रामाणिकपणे, कर्तव्यभावनेने आणि लोकहिताची जाणीव ठेवून काम करीत आहेत. मात्र, प्रशासनातील विविध स्तरांवरील निर्णयप्रक्रिया, कामकाजाची गती आणि उत्तरदायित्व यांचा एकत्रित परिणाम सामान्य नागरिकांच्या अपेक्षेइतका प्रभावी, पारदर्शक आणि लोकाभिमुख ठरत नसल्याचे संघटनांनी म्हटले. ‘हे आंदोलन भ्रष्टाचार, अनागोंदी, निष्क्रियता आणि जनउत्तरदायित्वशून्य प्रशासकीय वृत्तीविरोधात आहे,’ असे ॲड. कारभारी गवळी यांनी स्पष्ट केले.

आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीर बहादूर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, बाळासाहेब पालवे, हनुमंतराव साळवे, आनंदा आढाव, अभिमान शिंदे, चतुराबाई शिंदे, रमेश भोसले आदी सहभागी झाले होते.

# मोफत सर्वरोग निदान शिबिरात रुग्णांच्या तपासण्या

नगर – पैगंबर जयंतीचे औचित्य साधून अल करम हॉस्पिटलच्या वतीने मोफत सर्वरोग निदान व उपचार व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात नागरिकांची विविध आजारांसाठी तपासणी करण्यात आली. तसेच मोफत ब्लड ग्रुप, शुगरसह विविध रक्त तपासण्या करण्यात आल्या.

शिबिरामध्ये अल करम हॉस्पिटलचे डॉ.जहीर मुजावर यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांच्या आरोग्यविषयक तक्रारी जाणून घेतल्या. तसेच मधुमेह, रक्तदाब व इतर दीर्घकालीन आजारांबाबत रुग्णांना योग्य मार्गदर्शन करून आवश्यक आरोग्यविषयक सल्ला दिला.

यावेळी अल करम हॉस्पिटलचे तौफिक तांबोली, हाफीज अर्शद सय्यद, राजीक खान, अकीब सय्यद, शेख उसामा, तौसिफ रेडियमवाला, शेर अली शेख आदी उपस्थित होते. शिबिराचे सूत्रसंचालन एजाज तांबोली यांनी केले. प्रास्ताविक सरफराज कुरैशी यांनी केले, तर आभार आबीद दुलेखान यांनी मानले.

# मस्त मेयोनीज सँडविच

**झटपट रेसिपी**

संध्याकाळी खाण्यासाठी मस्तपैकी व्हेज मेयोनीज सँडविच तयार करता येईल. झटपट होणारं हे सँडविच तुम्हाला नक्कीच आवडेल.

**सामग्री:** आठ ब्रेड स्लाईस, चार ते पाच चमचे मेयोनीज, बारीक चिरलेले दोन कांदे, बारीक चिरलेली सिमला मिरची अर्धा कप, किसलेलं गाजर पाव कप, अर्धा टी स्पून मिरपूड, चार टी स्पून हिरवी चटणी, चमचाभर लाल तिखट, दोन टी स्पून बटर, चवीनुसार मीठ.

**कृती:** एका भांड्यात सर्व भाज्या घाला. त्यात मेयोनीज, मीठ, लाल तिखट, मिरपूड घालून नीट मिसळून घ्या.



आता दोन ब्रेड स्लाईस घ्या. ब्रेडच्या या दोन्ही स्लाईसवर हिरवी चटणी लावून घ्या. एका स्लाईसवर भाज्यांचं मिश्रण पसरा. त्यावर दुसरा ब्रेड ठेवा. तव्यावर थोडं बटर घाला. आता हे सँडविच तव्यावर ठेवा. दोन्ही ब्रेड नीट भाजून घ्या. एका प्लेटमध्ये काढा. या सँडविचचे दोन त्रिकोणी तुकडे करा. चटणी आणि सॉससोबत खा.




# रॅपर बनला उद्योजक

**अचिव्हर**



वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी रॅपर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या एका मुलाने कुटुंबावर आलेल्या आर्थिक संकटामुळे आपली स्वप्ने काही काळासाठी बाजूला ठेवली. वडिलांची प्रकृती खालावली, कौटुंबिक व्यवसाय डबघाईला आला आणि संपूर्ण कुटुंब संकटात सापडले. अशा वेळी परिस्थितीपुढे हार न मानता त्याने व्यवसायाची धुरा सांभाळण्याचा निर्णय घेतला. हाच निर्णय त्याच्या आयुष्यातील 'टर्निंग पॉइंट' ठरला. आज तो भारतातील यशस्वी युवा उद्योजक, पॉडकास्ट होस्ट आणि कंटेंट क्रिएटर म्हणून ओळखला जातो. त्यांचे नाव आहे राज शामानी.

२९ जुलै १९९७ रोजी मध्य प्रदेशातील इंदूर येथे जन्मलेल्या राज शामानी यांचे बालपण संघर्षमय वातावरणात गेले. त्यांचे आजोबा, वडील आणि काका रोजगाराच्या शोधात राजस्थानहून इंदूरमध्ये आले होते. सुरुवातीच्या काळात कुटुंबाने रस्त्यावर नारळ विकून उदरनिर्वाह केला. त्यानंतर त्यांच्या वडिलांनी 'जादूगर' या नावाने डिशवॉशर ब्रँड सुरू केला आणि कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारली; मात्र २००८ मधील जागतिक आर्थिक मंदीमुळे व्यवसायाला मोठा फटका बसला. त्यानंतर २०१३ मध्ये वडिलांची प्रकृती बिघडल्याने पुन्हा एकदा कुटुंब आर्थिक संकटात सापडले.

घरची परिस्थिती सुधारण्यासाठी राज यांनी नोकरीचा शोध सुरू केला. त्यांनी ८० हून अधिक कंपन्यांना ई-मेल पाठवले; मात्र एकाही कंपनीकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी वडिलांकडून १० हजार रुपये उसने घेतले आणि डिशवॉशिंग लिक्विड तयार करण्याचा छोटा व्यवसाय सुरू केला. या क्षेत्राचा कोणताही अनुभव नसतानाही त्यांनी यूट्यूबवरील व्हिडीओ, पुस्तके आणि वडिलांचे मार्गदर्शन याच्या मदतीने उत्पादन तयार करण्याचे कौशल्य आत्मसात केले. सुरुवातीला अनेक प्रयोग अपयशी ठरले, तरी त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत.

उत्पादन तयार झाल्यानंतर ते ग्राहकांपर्यंत पोहोचवणे हे मोठे आव्हान होते. स्थानिक दुकानदारांनी एका किशोरवयीन मुलावर विश्वास ठेवण्यास नकार दिला. त्यानंतर राज स्वतः घराघरांत जाऊन डिशवॉशिंग लिक्विडची विक्री करू लागले. ग्राहकांच्या प्रतिक्रिया लक्षपूर्वक ऐकून त्यांनी उत्पादनाची गुणवत्ता आणि किंमत यामध्ये सातत्याने सुधारणा केली. हळूहळू स्थानिक दुकानदारांनी त्यांच्या उत्पादनाला पसंती दिली आणि याच छोट्या यशातून पुढे शामानी इंडस्ट्रीजची भक्कम पायाभरणी झाली.

राज शामानी यांना सुरुवातीला सार्वजनिक मंचावर बोलण्याची भीती वाटत असे. इंग्रजी भाषेवरही त्यांचे विशेष प्रभुत्व नव्हते; मात्र त्यांनी हीच कमतरता आपली ताकद बनवली.

सातत्याने सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी वक्तृत्वकलेत प्रावीण्य मिळवले. वयाच्या अवघ्या १७व्या वर्षी त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या 'यूथ डेलिगेशन' कार्यक्रमांतर्गत भारताचे प्रतिनिधित्व केले. संयुक्त राष्ट्रांच्या युवा महासभेत सहभागी होणाऱ्या सर्वात कमी वयाच्या भारतीय वक्त्यांमध्ये त्यांचा समावेश झाला. त्यानंतर त्यांनी चार वेळा 'टेड एक्स' व्याख्याते म्हणूनही व्यासपीठ गाजवले.

'सोशल मीडिया'च्या माध्यमातून आपले अनुभव आणि व्यावसायिक शिकवण लाखो तरुणांपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय राज यांनी घेतला. सुरुवातीला त्यांच्या व्हिडीओंना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही; मात्र सातत्यामुळे त्यांचा पॉडकास्ट प्रचंड लोकप्रिय झाला. उद्योग, करिअर, उद्योजकता आणि वैयक्तिक विकास यावरील त्यांच्या मुलाखती आणि संवाद आज लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांचे 'बिल्ड, डोन्ट टॉक' हे पुस्तकही तरुणांमध्ये विशेष लोकप्रिय झाले आहे. त्यांच्या कामाची दखल घेत फोर्ब्स इंडिया '३० अंडर ३०' या प्रतिष्ठित यादीतही त्यांचा समावेश करण्यात आला.

# पुरुषांची क्लासिक स्टाइल

**फॅशन पॅशन**



पुरुषांच्या फॅशनमध्ये गेल्या काही वर्षांपासून बॅगी जीन्स आणि ओव्हरसाइज टी-शर्टचा ट्रेंड पाहायला मिळत होता; मात्र आगामी हंगामात या शैलीत मोठा बदल होण्याचे संकेत मिळाले आहेत. 'मिलान फॅशन वीक'मध्ये सादर झालेल्या मेन्सवेअर कलेक्शनमध्ये जगातील नामांकित फॅशन ब्रँड्सनी सैलसर कपड्यांऐवजी उत्तम फिटिंग, स्वच्छ कट आणि क्लासिक स्टाइलला प्राधान्य दिले आहे.

यंदाच्या फॅशन शोमध्ये सर्वाधिक चर्चा जीन्सच्या बदलत्या ट्रेंडची झाली. पारंपरिक निळ्या डेनिमऐवजी हिरवा, बरगंडी, पांढरा तसेच लेदर फिनिश असलेल्या ट्राउझर्सनी लक्ष वेधून घेतले. जीन्सची लोकप्रियता कायम राहणार असली, तरी तिचा रंग आणि सादरीकरण अधिक आकर्षक व वेगळे असणार असल्याचे या ट्रेंडमधून स्पष्ट झाले.


उन्हाळी फॅशनमध्ये शॉर्ट-स्लीव्ह ब्लेझर हे प्रमुख आकर्षण ठरले. पारंपरिक फॉर्मल ब्लेझरला अधिक हलके, आरामदायी आणि वापरण्यास सोपे रूप देण्याचा हा प्रयत्न असल्याचे फॅशन तज्ज्ञांचे मत आहे. व्हेकेशन वेअरमध्येही मोठे बदल दिसून आले. डोक्यापासून पायापर्यंत पांढऱ्या रंगाच्या पोशाखांचा ट्रेंड रॅम्पवर पाहायला मिळाला. हलक्या कापडाचे कपडे, खुल्या गळ्याचे शर्ट आणि आरामदायी सिल्हूटमुळे भूमध्य समुद्रकिनाऱ्यावरील उन्हाळी वातावरणाची झलक या कलेक्शनमध्ये पाहायला मिळाली.

याशिवाय प्रीपी स्टाइल पुन्हा एकदा फॅशनमध्ये परतताना दिसली. कार्डिगन, ऑक्सफर्ड शर्ट, रोइंग ब्लेझर आणि महाविद्यालयीन शैलीची आठवण करून देणारे क्लासिक पोशाख रॅम्पवर झळकले.

ॲक्सेसरीजमध्येही यंदा वेगळा बदल दिसून आला. लहान स्लिंग बॅगऐवजी मोठ्या लेदर सॅचेल आणि टोट बॅगना पसंती देण्यात आली. त्यामुळे पुरुषांसाठी बॅग ही केवळ गरजेची वस्तू न राहता 'फॅशन स्टेटमेंट' बनत असल्याचे स्पष्ट झाले.

# भविष्यात मागणी असलेल्या नोकऱ्या

**नोकरी हवीय?**



एआय आणि मशीन लर्निंग तज्ज्ञ: शिकू शकतील आणि जुळवून घेऊ शकतील अशा बुद्धिमान प्रणाली तयार करणे. या भूमिकांमध्ये अल्गोरिदम आणि मॉडेल्स विकसित करणे समाविष्ट आहे. ते मशीनस स्वायत्तपणे कार्य करण्यास सक्षम करतात.

* **शाश्वतता तज्ञ:** संस्थांना अधिक पर्यावरणपूरक बनण्यास मदत करणे. हे व्यावसायिक पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि हरित तंत्रज्ञानाशी संबंधित प्रकल्पांवर काम करतात.
* **डिजिटल मार्केटिंग व्यावसायिक:** ब्रँडचा प्रचार करण्यासाठी सतत बदलणाऱ्या डिजिटल लँडस्केपमध्ये नेव्हिगेट करणे. ते प्रभावी मार्केटिंग धोरणे तयार करण्यासाठी डेटा ॲनालिटिक्स आणि डिजिटल टूल्स वापरतात.
* **आरोग्यसेवा कर्मचारी:** वृद्ध लोकसंख्येच्या वाढत्या गरजा पूर्ण करणे. यामध्ये वृद्धांची काळजी, टेलिमेडिसिन आणि आरोग्यसेवा प्रशासनातील भूमिकांचा समावेश आहे.
* **टेक डेव्हलपर्स:** ब्लॉकचेन, व्हीआर आणि आयओटी सारख्या क्षेत्रात विशेषज्ञता असलेले. हे डेव्हलपर्स उद्योगांच्या डिजिटल परिवर्तनाला चालना देणारे नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान तयार करतात.

भविष्यातील मागणी असलेल्या नोकऱ्या समजून घेतल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअर नियोजन प्रक्रियेला उदयोन्मुख संधींशी जुळवून घेण्यास मदत होऊ शकते.

**ॲप वर्ल्ड**




## व्हॉट्सॲपमध्ये पाच नवीन फिचर्स

व्हॉट्सॲप वेब आता आणखी सुपरफास्ट आणि पॉवरफुल झाले आहे. कंपनीने ब्राउझरवरून थेट ग्रुप ऑडिओ आणि व्हिडीओ कॉल्स करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याशिवाय कॉल ट्रान्सफर, वेटिंग रूम, क्विक एचडी आणि नॉईज सप्रेशन सारखी अनेक नवीन फीचर्सही जोडण्यात आली आहेत.

पूर्वी व्हॉट्सॲप वेबवर कॉल करण्यासाठी डेस्कटॉप ॲप आवश्यक होते. आता ब्राउझर उघडल्यावर थेट ग्रुप कॉल करता येईल. सर्व कॉल्स एंड-टू-एंड एनक्रिप्टेड राहतील. स्क्रीन शेअरिंग आणि इमोजी रिॲक्शन्सचीही सुविधा उपलब्ध आहे.


**कॉल ट्रान्सफर :** हे फीचर खूप उपयुक्त आहे. तुम्ही फोनवर ग्रुप कॉल सुरू केलात आणि घरी आलात तर तो कॉल थेट लॅपटॉपवर ट्रान्सफर करता येईल. उलटही शक्य आहे. यामुळे कॉल डिस्कनेक्ट होणार नाही.

**वेटिंग रूम :** ग्रुप कॉल लिंक्ससाठी वेजटंग रूम पर्याय उपलब्ध झाला आहे. होस्टने 'रिक्वायर अप्रूव्हल टू जॉइन' सेटिंग चालू केल्यास नवीन मेंबर आधी वेटिंग रूममध्ये थांबतील. 'होस्ट'ने परवानगी दिल्यावरच ते कॉलमध्ये सामील होतील.

**क्विक एचडी आणि नॉईज सप्रेशन :** क्विक एचडीमुळे व्हिडिओ क्वालिटी लगेच एचडी होईल. नॉईज सप्रेशन फीचर बॅकग्राउंडचा आवाज कमी करेल. त्यामुळे गोंधळातही स्पष्ट संवाद होईल.

हे फीचर्स जगभरातील वापरकर्त्यांसाठी टप्प्याटप्प्याने उपलब्ध होणार आहेत. व्हॉट्सॲप वेब आता फोन आणि डेस्कटॉप ॲपसारखेच शक्तिशाली होत आहे. या अपडेटनंतर व्हॉट्सॲप केवळ मेसेजिंग ॲप न राहता पूर्णपणे व्यावसायिक आणि वैयक्तिक संवादाचे प्लॅटफॉर्म बनले आहे.

**टेक्नो टॉक**



## मोबाईल चालणार उपग्रहाद्वारे

तुम्ही कधीतरी एखाद्या दुर्गम भागात असलेल्या खेडेगावात गेला, ट्रेकिंगसाठी एखाद्या जंगलात, पर्वतावर गेला आणि तिथे फोनचं नेटवर्क पूर्णपणे गायब झालं, असं कधी तुमच्यासोबतही घडलंय का? अशावेळी फोन किंवा मेसेजेसच्या माध्यमातून संपर्क साधणं कठीण होऊन जातं; मात्र तुमच्या हातात असलेला स्मार्टफोन हा कुठल्याही मोबाईल टॉवर किंवा अंतराळातून येणाऱ्या सिग्नलच्या माध्यमातून चालला तर? आता अशीच सुविधा निर्माण करण्यासाठी प्रसिद्ध ई-कॉमर्स आणि टेक कंपनी मेझॉनने तयारी सुरू केली आहे.

मेझॉन आता तुमच्या हातामधील स्मार्टफोनला थेट अंतराळाशी जोडण्याच्या तयारीत आहे. कंपनीने आपल्या 'मेझॉन लियो प्रोजेक्ट'अंतर्गत नवं 'डायरेक्ट टू डिव्हाईस नेटवर्क' लॉन्च करण्याची तयारी सुरू केली आहे. या माध्यमातून मोबाईल नेटवर्क नसलं, तरी यूझर्सना फोन कॉल, मेसेजिंग, इंटरनेट डेटा आणि इमर्जन्सी सेवांचा वापर करता येणार आहे. मेझॉनने यासाठी अमेरिकन रेग्युलेटर एफसीसीकडे अर्ज सादर केला आहे. त्यामधून ५ हजार १०५ लो अर्थ ऑर्बिट ,सॅटेलाईट तैनात करण्याची परवानगी मागण्यात आली आहे. याला मान्यता मिळाली, तर ही सेवा २०२८ पासून दिली जाईल.

कंपनीचं हे नेटवर्क 'डायरेक्ट टू डिव्हाईस' (डी २ डी) घर, ऑफिसमधील ब्रॉडबँडऐवजी थेट तुमच्या स्मार्टफोनशी कनेक्ट होणार आहे. ही सेवा जगभरातील टेलिकॉम ऑपरेटर्ससोबत मिळून काम करेल. त्यामुळे दुर्गम भाग, जंगल, समुद्र किंवा आपत्तीनिवारणामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांमध्ये नेटवर्क पोहोचवणं शक्य होणार आहे. 'मेझॉन'ने हल्लीच 'ग्लोबल स्टार'चं स्पेक्ट्रम ॲसेट खरेदी केलं आहे. ते सध्या पर्ल आयफोनच्या इमर्जन्सी 'एसओओएस फिचर्स'ला सपोर्ट करते. मेझॉन आता भविष्यातील सॅटेलाईट सर्व्हिससाठी पर्लसोबत काम करण्याची योजना आखत आहे.

# 'एनटीए'मध्ये नोकरीची संधी

**रोजगारवाटा**

'नीट' पेपरफुटी प्रकरणानंतर 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' (एनटीए) मध्ये मोठे बदल सुरू झाले आहेत. ४७ अधिकाऱ्यांना बडतर्फ केल्यानंतर 'एनटीए'ने मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया सुरू केली आहे. त्यानुसार चार जनरल मॅनेजरची नियुक्ती केली जाणार आहे. याशिवाय केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या प्रतिभा सेतू पोर्टलद्वारे १६ यंग प्रोफेशनल्सचीही नियुक्ती केली जाणार आहे.

ही भरती प्रा. के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीतील पहिले मोठे पाऊल मानले जात आहे. राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यानंतर या समितीची स्थापना करण्यात आली होती. चारही जनरल मॅनेजर पदांवर सुरुवातीला तीन वर्षांच्या करारावर नियुक्ती केली जाणार आहे. त्यानुसार 'ॲसेसमेंट रिसर्च डेव्हलपमेंट अँड सायकोमेट्रिक्स' विभागातील अधिकारी प्रश्नपेढी तयार करणे, मूल्यमापन पद्धती, नॉर्मलायझेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित परीक्षा प्रणाली विकसित करण्यावर लक्ष देणार आहेत. 'टेस्ट सेंटर नेटवर्क अँड ऑपरेशन्स' विभाग देशभरातील ५०० हून अधिक शहरांमधील तसेच परदेशातील परीक्षा केंद्रांचे नियोजन आणि व्यवस्थापन पाहणार आहे.

याशिवाय 'इनफॉर्मेशन सिक्युरिटी' विभागातील अधिकारी सायबर सुरक्षा, डेटा संरक्षण आणि डिजिटल सुरक्षा यंत्रणा मजबूत करण्याची जबाबदारी सांभाळतील, तर 'व्हिजिलन्स, इन्व्हेस्टिगेशन अँड फॉरेन्सिक्स' विभाग परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकारांची चौकशी, डिजिटल फॉरेन्सिक तपास आणि सीबीआय, आयबी, ईडी, राज्य पोलीस तसेच सायबर क्राइम यंत्रणांशी समन्वय साधण्याचे काम करणार आहे.


दरम्यान, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या 'प्रतिभा सेतू पोर्टल'च्या माध्यमातून १६ यंग प्रोफेशनल्सचीही भरती होणार आहे. त्यामध्ये १२ पदे शैक्षणिक संशोधनासाठी, दोन कायदेशीर संशोधनासाठी आणि दोन वित्त व लेखा विभागासाठी आहेत. सुरुवातीला दोन वर्षांच्या करारावर हे अधिकारी नियुक्त केले जाणार आहेत.

# बीएएमएस की बीएचएमएस?

**उच्च शिक्षण**

वैद्यकीय क्षेत्रातील करिअरसाठी एमबीबीएसऐवजी अन्य पर्याय म्हणून 'बीएएमएस' आणि 'बीएचएमएस' हे दोन महत्त्वाचे पर्याय उपलब्ध असतात. दोन्ही अभ्यासक्रमांद्वारे डॉक्टर होण्याची संधी मिळते; परंतु त्यांची उपचारपद्धती, अभ्यासक्रम, आवश्यक कौशल्ये आणि करिअरच्या संधींमध्ये काही महत्त्वाचे फरक आहेत.

**बीएएमएस :** हा अभ्यासक्रम भारतातील पारंपरिक आयुर्वेद शास्त्रावर आधारित आहे. शरीरातील दोष, आहार-विहार, पंचकर्म, वनौषधी आणि नैसर्गिक उपचार यांच्या माध्यमातून रुग्णांवर उपचार केले जातात. आयुर्वेद ही हजारो वर्षांची उपचारपद्धती असून आजच्या काळात तिचे महत्त्व पुन्हा वाढत आहे. जीवनशैलीशी संबंधित आजार, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि नैसर्गिक उपचारांकडे लोकांचा वाढता कल असल्यामुळे बीएएमएस डॉक्टरांची मागणीही वाढत आहे.




**बीएचएमएस :** हा अभ्यासक्रम होमिओपॅथी या उपचारपद्धतीवर आधारित आहे. अतिशय कमी मात्रेतील औषधांचा वापर करून शरीराची नैसर्गिक रोगप्रतिकारक क्षमता वाढवण्यावर या उपचारपद्धतीचा भर असतो. दीर्घकालीन आजार, ॲलर्जी, त्वचारोग आणि काही जीवनशैलीशी संबंधित समस्यांमध्ये होमिओपॅथीचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. अनेक रुग्ण आजही होमिओपॅथीवर विश्वास ठेवतात.

दोन्ही अभ्यासक्रमांचा कालावधी साडेपाच वर्षांचा (इंटर्नशिपसह) असून, प्रवेशासाठी 'नीट' परीक्षा पात्रता आवश्यक असते. या दोन्ही अभ्यासक्रमांमध्ये ॲनाटॉमी, फिजिओलॉजी, बायोकेमिस्ट्री, पॅथॉलॉजी, फार्माकॉलॉजी यांसारखे आधुनिक वैद्यकीय विषय शिकवले जातात; मात्र 'बीएएमएस'मध्ये आयुर्वेदाची मूलतत्त्वे, द्रव्यगुणशास्त्र, रसायनशास्त्र, पंचकर्म, शल्यतंत्र, शालाक्यतंत्र, कायचिकित्सा, प्रसूती व स्त्रीरोग यासारख्या विषयांचा सखोल अभ्यास केला जातो. 'बीएचएमएस'मध्ये ऑरगॅनॉन ऑफ मेडिसिन, मटेरिया मेडिका, रिपेरटोरी, होमिओपॅथिक फार्मसी तसेच विविध रोगांवरील होमिओपॅथिक उपचारपद्धती यांचा अभ्यास केला जातो. रुग्णांच्या लक्षणांचा सखोल अभ्यास करून योग्य औषध निवडण्याचे प्रशिक्षण या अभ्यासक्रमात दिले जाते.

**आवश्यक कौशल्ये :** रुग्णांशी प्रभावी संवाद साधण्याची क्षमता, निरीक्षणशक्ती, संयम, निर्णयक्षमता, विश्लेषणात्मक विचार, वैद्यकीय नैतिकतेचे पालन ही गुणवैशिष्ट्ये या दोन्ही क्षेत्रांतील डॉक्टरमध्ये असणे आवश्यक आहे. केवळ औषधोपचार करणे पुरेसे नसून रुग्णांचा विश्वास जिंकणे आणि त्यांना मानसिक आधार देणेही तितकेच महत्त्वाचे असते.

**करिअरच्या संधी :** 'बीएएमएस' पदवीधरांना आयुर्वेदिक रुग्णालये, सरकारी व खासगी आरोग्य संस्था, पंचकर्म केंद्रे, वेलनेस क्लिनिक, आयुर्वेदिक औषधनिर्मिती कंपन्या, संशोधन संस्था आणि अध्यापन क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध होतात. तसेच स्वतःचे आयुर्वेदिक क्लिनिक सुरू करता येते. 'बीएचएमएस' पदवीधरांना होमिओपॅथिक रुग्णालये, दवाखाने, संशोधन संस्था, अध्यापन, औषधनिर्मिती उद्योग, व्यसनमुक्ती केंद्र तसेच स्वतःचा होमिओपॅथिक दवाखाना सुरू करण्याची संधी मिळते.

# उत्तराखंड: आयुर्वेदिक टुरिझम सेंटर

**मेडिकल टुरिझम**

उत्तराखंडला आयुर्वेद आणि वेलनेस टुरिझमचे मोठे केंद्र बनवण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पर्यटकांना पर्यटनासोबतच आयुर्वेदिक उपचार आणि पंचकर्मांचा लाभ मिळावा, यासाठी राज्यातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि धर्मशाळांमध्ये आयुष आरोग्य केंद्रे सुरू करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या केंद्रांमुळे उत्तराखंडात येणाऱ्या पर्यटकांना प्रवासादरम्यानच आयुर्वेद, योग आणि पंचकर्माच्या सुविधा मिळू शकतील.



उत्तराखंड हे आयुर्वेद आणि योगासाठी प्रसिद्ध आहे. हरिद्वार आणि ऋषिकेश यापूर्वीच जगभरातील पर्यटकांसाठी वेलनेस टुरिझमची महत्त्वाची ठिकाणे बनली आहेत. आता ही सुविधा राज्यातील इतर पर्यटनस्थळांपर्यंत पोहोचवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि धर्मशाळांमध्ये आयुष केंद्रे सुरू झाल्यास पर्यटकांना वेगळे आरोग्य केंद्र शोधण्याची गरज भासणार नाही. मुक्कामाच्या ठिकाणीच त्यांना आयुर्वेदिक उपचार, पंचकर्म आणि इतर आरोग्यविषयक सुविधा मिळू शकतील. या केंद्रांसाठी आवश्यक मानके निश्चित केली जात आहेत. केंद्र सरकारसोबत समन्वय साधून या योजनेसाठी आवश्यक निधी आणि मंजुरी मिळवण्याची प्रक्रिया केली जाणार आहे.

उत्तराखंडातील १४८ आयुष्मान आरोग्य मंदिरे 'राष्ट्रीय ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अँड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स' (एनएबीएच) च्या निर्धारित मानकांवर खरी उतरली आहेत. त्यामुळे राज्यात दर्जेदार आयुष सेवा देण्यासाठी आधीच मजबूत व्यवस्था तयार झाली आहे. उत्तराखंडमध्ये सध्या ४६ पंचकर्म केंद्रे कार्यरत आहेत. या केंद्रांमधील सुविधा आणखी सक्षम करण्यासाठी आयुष डॉक्टर आणि पंचकर्म तंत्रज्ञांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. पंचकर्माच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध झाल्यामुळे देशभरातून तसेच परदेशातून उत्तराखंडात येणाऱ्या पर्यटकांना मोठा फायदा होऊ शकतो.

उत्तराखंडच्या डोंगराळ भागात अनेक दुर्मीळ आणि औषधी वनस्पती मोठ्या प्रमाणात आढळतात. ही नैसर्गिक संपत्ती राज्याला आयुर्वेद आणि वेलनेस टूरिझमचे महत्त्वाचे केंद्र बनवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. सरकारच्या या प्रयत्नांमुळे उत्तराखंडात येणाऱ्या पर्यटकांना निसर्गरम्य वातावरणासोबत आयुर्वेद, पंचकर्म आणि योगाचा अनुभव एकाच ठिकाणी घेता येणार आहे. पर्यटन आणि आरोग्यसेवेची ही जोड राज्याच्या वेलनेस टूरिझमला नवी दिशा देऊ शकते.

# धावल्यानंतर भूक का लागते?

**फिटनेस फंडा**

काही किलोमीटर धावल्यानंतर अनेकांना भूक लागते. पण धावून खर्च केलेल्या कॅलरींवर खाऊन पाणी फेरता येत नाही. म्हणूनच अतिखाणं टाळण्यासाठी या भूकेची नेमकी कारणं जाणून घ्यायला हवीत. शरीराची गरज समजून घेतली की सगळं काही सोपं होऊन जाईल.



* धावताना बऱ्याच कॅलरी खर्च झाल्याने शरीरातली ऊर्जा कमी होते. ऊर्जेची ही गरज भागवण्यासाठी शरीराला अन्नाची गरज लागते. म्हणून आपल्याला खूप भूक लागते.
* डाएट करणाऱ्यांना धावल्यानंतर खूप भूक लागू शकते. डाएट करणारे आधीच कमी कॅलरी घेत असतात. त्यातच धावल्यामुळे शरीरातल्या उरल्यासुरल्या कॅलरी खर्च होतात आणि शरीर अन्नाची मागणी करतं.
* धावल्यानंतर अनेकांना भूक नाही तर तहान लागते. आपल्याला भूक लागली आहे का तहान, याबाबत अनेकांचा गोंधळ उडतो. या गोंधळात काही लोक खूप खातात आणि डिहायड्रेट होतात. तसंच भूक पाण्याने मारणंही चुकीचं आहे. भूक आणि तहान यातला फरक ओळखायला शिका.
* अनेकांना मानसिक कारणांमुळे भूक लागते. आपण खूप धावलोय. त्यामुळे आता आपल्याला खायला हवं, असे विचार मनात आल्यामुळे प्रत्यक्षात भूक लागलेली नसतानाही खावंसं वाटतं.
* व्यायामाच्या प्रत्येक प्रकाराचा तुमच्या भूकेवर वेगळा परिणाम झाल्याचं पहायला मिळतं. धावणं हा तीव्र स्वरुपाचा व्यायाम आहे. यामुळे प्रचंड कॅलरी खर्च होतात आणि भूक लागते. पण प्रत्येक व्यायामप्रकाराच्या बाबतीत असं म्हणता येणार नाही. काही प्रकारच्या व्यायामांनंतर भूक मरते.

# अहिल्या सरस्वती महोत्सवात घडले इतिहास, संस्कृती, परंपरा आणि आधुनिकतेचे दर्शन

### अहिल्या गौरव, सरस्वती गौरव पुरस्कारांचे वितरण, स्त्री शक्तीचा सन्मान

नगर – क्षेत्र कोणतेही असो स्त्री ही स्वकर्तृत्वाने अधिक कणखर, सक्षमच असते. इतिहासातील अहिल्यादेवींपासून ते आताच्या आधुनिक काळातील पोलिस, वकील, डॉक्टर, न्यायाधीश, शेतकरी, कॉर्पोरेट वुमन, गृहिणी अशा सर्वच महिला स्त्री शक्तीच्या आदर्श आहेत. समाजात स्त्री शक्तीप्रती कायम आदर व्यक्त व्हावा या संदेशासह आणि एक सक्षम व्यक्ती म्हणून तिचे असलेले महत्त्व अधोरेखित करणारी अतिशय सुंदर जिवंत नाटिका ३० ऑगस्ट रोजी अहिल्या सरस्वती महोत्सवात सादर झाली. या महोत्सवातून अहिल्यादेवींच्या लेकींचा आत्मविश्वास, दृढता, संस्कृती परंपराप्रती असलेली बांधिलकी आणि आधुनिक युगातील आव्हाने पेलण्याची ताकद उपस्थितांना पहायला मिळाली.





अहिल्या सरस्वती महोत्सवात अहिल्या गौरव, सरस्वती गौरव पुरस्कारांचे वितरण करताना मान्यवर तसेच यावेळी झालेला फॅशन शो.

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पुढाकाराने झालेल्या या अहिल्या सरस्वती महोत्सवात महिलांना मुक्त व्यासपीठ देऊन त्यांना निखळ आनंदाची संस्मरणीय भेट देण्यात आली. सुरूवातीला सादर झालेल्या नाटिकेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची एंट्री सर्वांना इतिहासात नेणारी ठरली. अहिल्या नगरमध्ये साक्षात अहिल्यादेवी आल्याचा अनुभव सर्वांनी घेतला. त्यांच्या देदीप्यमान इतिहासाचा कालखंड उलगडत नाटिकेत अहिल्यादेवींच्या कर्तृत्ववाचा वारसा आधुनिक काळात पुढे चालवणाऱ्या महिला शक्तीचे दर्शन सर्वांना झाले.

नंदनवन लॉन्स येथील या महोत्सवातील फॅशन शो सुद्धा अहिल्यानगरच्या परंपरेला साजेसा झाला. गीतसंगीताच्या तालावर युवती, महिला, कपल्स, गरोदर माता, आई व मुलगी, डॉक्टर अशा सर्वांनीच नजाकतदार, रूबाबदार आणि डौलदार रॅम्प वॉक करून फॅशन रनवेचा आनंद लुटला. मराठमोळा साज शृंगार, मिस मॅच वॉक, प्रिन्सेस वॉक, श्रीमान मेन्स वॉकमध्ये प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि आनंद पहायला मिळाला. पारंपरिक व आधुनिक फॅशनचा हा अनोखा संगम लक्षवेधी ठरला.

याप्रसंगी ॲड. मोनिका पंकज आशिया, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उपमहापौर धनंजय जाधव, डॉ. अमोल जाधव, डॉ . प्राजक्ता जाधव, मनपा स्थायी समितीच्या माजी सभापती सुवर्णा जाधव, दत्ता जाधव, संजय जाधव, टायटल स्पॉन्सर महावीर ग्रुपचे राजेश भंडारी, श्रद्धा देडगावकर, अल्पना कासवा, मिनाताई सत्रे, मुंदडा, रचना काकडे, गुणाली मुथा, विचार भारतीचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील कर्तृत्ववानांचा विशेष पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला. यात सरस्वती गौरव पुरस्कार – अपूर्वा निषाद, अहिल्या गौरव पुरस्कार – पोलिस निरीक्षक ज्योती गडकरी, अहिल्या युवा प्रतिभा पुरस्कार – विराज अवचिते, सरस्वती कलागौरव पुरस्कार – गौरी कुलकर्णी, सरस्वती साहित्य गौरव पुरस्कार – भूपाली निसळ आणि अहिल्या जीवनगौरव पुरस्कार – डॉ. सुधा कांकरिया यांना प्रदान करण्यात आला. महोत्सवातील अहिल्या शक्ती स्टाईल आयकॉन पुरस्कार स्नेहल कानडे, बेस्ट पारंपरिक वेशभूषा पुरस्कार – निशा गोयल, बेस्ट बाईक सजावट – भालेराव, बेस्ट बाईकर ग्रुप – इम्प्रेस बाईकर्स ग्रुप, बेस्ट राईडर पुरस्कार प्रचेत्सा चंद्रशेखर जीटी बाईकर यांना देण्यात आला.

स्वागत करताना डॉ.अमोल जाधव म्हणाले की, ऐतिहासिक वारसा असलेले अहिल्यानगर आधुनिक युगातही नवा इतिहास निर्माण करण्यात अग्रेसर आहे. अहिल्या सरस्वती महोत्सव आयोजित करताना इतिहास, ज्ञान, कर्तुत्व, सक्षमीकरण आणि संस्कृती असा मिलाफ साधला. प्रत्येक कार्यक्रमातून महिला शक्तीची प्रचिती आली.

या महोत्सवात मोव्ह आणि मी, आय.ए. एफ. डी., साज, श्रीमान, मिस मॅच, रंगोली द रेंटल बुटिक हे डिझायनर पार्टनर, फॅशन पार्टनर – कोहिनूर, फोटोग्राफी पार्टनर – रेनड्रॉप, मीडिया पार्टनर – सागर गंधारे, रेडिओ पार्टनर – रेडिओ सिटी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश सोनी व उद्धव काळापहाड यांनी केले.



## गुरुवाणी – ३७
### आतील कचरा साफ करा

काही गोष्टी प्रॅक्टिकल करूनच समजतात. ते समजून घेत श्रद्धेने करायचे असते. जीवनाचा खेळ श्वासाचा आहे. आयुष्य, व्यक्तिमत्त्व, पचनक्रिया, आरोग्य, झोप हे सगळं श्वासावर अवलंबून आहे. श्वासोच्छ्वासावर नियंत्रण करता आले तर जीवन सुखकर होते. परिस्थितीला शरण जायचे की परिस्थिती बदलायची हे सुद्धा श्वासावर अवलंबून असते. हे एक तंत्र आहे. जीन शासनाच्या ज्ञानाचा योग्य पद्धतीने उपयोग केला तर तुम्हाला इतरत्र कुठेही जाण्याची आवश्यकता राहणार नाही. शरीर आहे पण श्वास नसेल तर शरीर काहीच करू शकत नाही. ऑक्सिजनचा 'आश्रव' आणि कार्बन डाय ऑक्साईडची 'निर्जरा'औऔऔ ही प्रक्रिया व्यवस्थित चालली तर शरीर स्वस्थ राहते. घरात आपण कानाकोपऱ्यातील कचरा साफ करतो. तसेच शरीर सुद्धा घरच आहे. तिथेही साफसफाई झाली पाहिजे. शरीरातील टॉक्सिन वाढले तर स्वास्थ्य खराब होणारच. पुरेसा आहार घेऊन तो योग्य पद्धतीने पचला तरच शरीराला ताकद मिळते. गुरूदेव आचार्य भगवंत वयाच्या नव्वदीनंतरही तंदुरुस्त होते. त्यांच्या चेहऱ्यावर तेज होते. ते कोणताही व्यायाम, प्राणायाम करायचे नाहीत. ते फक्त खोल श्वासोच्छ्वास करायचे. ज्या विहिरीतून पाणी काढलं जातं नाही, ते पाणी काही काळाने पिण्यायोग्य राहत नाही. मेंदूला डस्टबिन नका बनवू, लॉकर बनवा. कारण आपण लॉकरमध्ये कचरा टाकत नाही.कचरा डस्टबिनमध्येच टाकतो. तुम्ही जे त्याच्यात टाकाल तेच तुमच्यापाशी कायम राहील. तुम्ही तुमच्याच मुलांना सैतान, नालायक म्हणता, मग तुम्ही सुद्धा सैतान, नालायकाचे आई बाप ठरता. यासाठी आपल्यातील कचरा साफ करा. पूज्य आचार्य अमोलकऋषीजी महाराज अजमेर येथील अतिभव्य संत संमेलनात सहभागी झाले होते. तिथे संघ एक करण्याचा विषय होता. अमोलकऋषीजी महाराज सकाळी लवकर उठायचे व झोपलेल्या इतर साधूंना तीन वेळा वंदना करायचे. आचार्य असूनही ते कनिष्ठ साधूंना वंदना करायचे. त्यांना याचे कारण विचारले असता ते म्हणाले, 'काय माहिती की यापैकी कोणाची आत्मा माझ्या आधी मोक्ष मध्ये जाईल. अशा आत्म्याला वंदना केल्यावर माझ्या कर्माची निर्जराच होईल'. अशी भावना, विचार हवेत. कोणी तुमचा अपमान केला, कोणी ऐकलं नाही म्हणून तुम्ही रागावता. अशावेळी दीर्घ श्वास सोडत 'नमो अरिहंताणं सव्व पावप्पणासणो' हा जाप करा. तुम्हालाच मोठा बदल जाणवेल.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# जिल्ह्यातील सव्वा चार लाखांहून अधिक मतदारांची नावे वगळली

### प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध, जिल्ह्यात आता ३३ लाख ८३ हजार १८७ मतदार

नगर – विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अंतर्गत राबविण्यात आलेल्या मतदार यादी पडताळणीत अहिल्यानगर जिल्ह्यात ३८ लाख १० हजार मतदारांपैकी ४ लाख २६ हजार ९३० (११.२२ टक्के) मतदार मयत, दुबार किंवा कायमस्वरूपी स्थलांतरित (असंकलित मतदार) आढळून आले होते, ही नावे वगळण्यात आली आहेत. ३१ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील ३३ लाख ८३ हजार १८७ मतदारांची प्रारूप मतदार प्रसिध्द करण्यात आली आहे.

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. त्यांचे निराकरण २९ ऑक्टोबरपर्यंत करण्यात येईल. अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहे. आयोगाने दिलेल्या वेबसाईटवर आपले नाव मतदार यादीत बघता येणार आहे. तसेच बीएलओकडूनही याची माहिती घेता येईल. सुनावणी दरम्यान कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी जिल्हास्तरावर कक्ष तयार करण्यात आला आहे. तालुकास्तरावर समन्वयासाठी तालुकास्तरीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचा मिळून एक कक्ष स्थापन करण्यात आला आहे. असंकलित मतदारांचे (मयत, दुबार, कायमस्वरूपी स्थलांतरित) आवश्यक ते रेकॉर्ड बीएलओंनी जतन करून ठेवावे, तसेच प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीनंतर नमुना ६, ७ व ८ पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवावे, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

वगळलेल्या मतदारांमध्ये मयत मतदार १ लाख ४१ हजार २१२, गैरहजर ५० हजार १६७, कायमस्वरूपी स्थलांतरित १ लाख ७१ हजार ७१९, इतर मतदार १ हजार १२५, यापूर्वीच नोंदणी झालेले ६२ हजार ७०७ यांचा समावेश आहे.

### जिह्यातील मतदारांची आकडेवारी

प्रारुप मतदार यादीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांमधील एकूण मतदारांची संख्या ३३ लाख ८३ हजार १८७ इतकी आहे. यात अकोले २ लाख ५२ हजार २५१, संगमनेर २ लाख ६३ हजार ११४, शिर्डी २ लाख ५३ हजार ५४४, कोपरगाव २ लाख ५० हजार ०७६, श्रीरामपूर २ लाख ७४ हजार ७२६, नेवासा २ लाख ६५ हजार ३८९, शेवगाव ३ लाख ३५ हजार ५५७, राहुरी २ लाख ९५ हजार ६७२, पारनेर ३ लाख १९ हजार ६०९, नगर शहर २ लाख ४६ हजार ४२४, श्रीगोंदा ३ लाख ८ हजार ११६. कर्जत जामखेड ३ लाख १८ हजार ७०९ आणि एकूण मतदार ३३ लाख ८३ हजार १८७.

### दावे–हरकती दाखल करण्याचे आवाहन

मतदार यादीत नाव, स्पेलिंग, वय/जन्मतारीख, फोटो, पत्ता, मतदार क्रमांक आणि मतदान केंद्र योग्य आहे का, हेही तपासून घ्यावे. मतदार यादीत नाव नसल्यास ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत दावे–हरकती दाखल करता येतील. त्यावर सुनावणी होईल. नवीन नाव नोंदणीसाठी / वगळलेले नाव पुन्हा समाविष्ट करण्यासाठी नमुना क्रमांक ६ आवश्यक कागदपत्रे आणि घोषणापत्रासह भरावा.असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# स्वातंत्र्यानंतर मिळाले काय..! आमच्या हाती आलं काय..!

### घोषणांनी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणला

नगर –स्वातंत्र्यानंतर मिळाले काय..! आमच्या हाती आलं काय..! अशा तीव्र आणि आक्रमक घोषणांनी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय परिसर पूर्णपणे दणाणून गेला. ३१ ऑगस्ट या 'विमुक्त दिना'च्या पार्श्वभूमीवर विमुक्त, भटक्या, अर्ध–भटक्या व आदिवासी समाजाच्या प्रलंबित मागण्या आणि विद्यार्थ्यांच्या गंभीर शैक्षणिक प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पक्षनेते प्रा. किसन चव्हाण यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली हे जोरदार आंदोलनात्मक निदर्शने करण्यात आले.



'विमुक्त दिना'च्या पार्श्वभूमीवर विमुक्त, भटक्या, अर्ध–भटक्या व आदिवासी समाजाच्या प्रलंबित मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करताना वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश साठे, संतोष चोळके, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, कल्याण भागवत, हनीफ शेख, योगेश गुंजाळ, सुहास धिवर, दादा समुद्र, अविनाश धनवे, सुशील साळवे, अजित कुऱ्हाडे, संकेत शिंदे, देविदास भालेराव, प्रतीक ठोकळ, तालुकाध्यक्ष पोपट शेटे, प्यारेलाल शेख, रविकिरण जाधव, बाळासाहेब जाधव, अंकुश साळवे, बुवा चव्हाण, उत्तमराव सावंत, नागेश शिंदे, पिनु भोसले, संजय शिंदे, पोपट थोरात, मनोज साळवे, चंद्रकांत नेटके, राहुल पोळ, प्रमोद आढाव, शिवाजी पवार, अमर जाधव, बाबासाहेब आल्हाट यांच्यासह अनेक भटके–विमुक्त व आदिवासी समाजातील बांधव उपस्थित होते. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना समाजाच्या विविध मूलभूत प्रश्नाबाबत सविस्तर निवेदन सादर करून संविधानाची प्रत भेट देण्यात आली व प्रशासनाकडून तातडीने ठोस कार्यवाहीची मागणी करण्यात आली.

३१ ऑगस्ट १९५२ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जयपाल सिंग मुंडा यांच्या अथक संघर्षातून ब्रिटिश राजवटीतील जुलमी 'जन्मजात गुन्हेगार कायदा' रद्द होऊन विमुक्त–भटक्या जमातींना स्वतंत्र भारतात नागरिक म्हणून मुक्ती मिळाली होती. या ऐतिहासिक घटनेला ७४ वर्षे पूर्ण होत असतानाही, या प्रदीर्घ कालावधीनंतर विमुक्त, भटक्या व आदिवासी समाजाला स्वातंत्र्याचा खरा लाभ मिळालेला नाही, अशी खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली. केंद्र शासनाचे रेनके आयोग व इदाते आयोग यांच्या शिफारशी वर्षांनुवर्षे प्रलंबित असून वसंतराव नाईक विकास महामंडळ व आदिवासी विकास विभागाच्या योजना तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचत नाहीत. हा समाज आजही मूलभूत सुविधा, निवारा, शेतजमीन आणि रोजगारापासून वंचित असून त्याची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उपेक्षा कायम आहे.

प्रशासनाने या निवेदनाची गंभीर दखल घेऊन हे निवेदन प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधित शासकीय विभागांची संयुक्त आढावा बैठक आयोजित करावी आणि निवेदनावर केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल वंचित बहुजन आघाडीला द्यावा, अशी स्पष्ट अट निवेदनात घालण्यात आली आहे. सदर ३० दिवसांच्या मुदतीत जर प्रशासनाकडून समाधानकारक व ठोस कार्यवाही झाली नाही, तर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात विमुक्त, भटक्या व आदिवासी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा प्रा. किसन चव्हाण व शिष्टमंडळाच्या वतीने देण्यात आला आहे.

# महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार सह. पतसंस्थेच्या चेअरमनपदी राजेंद्र दगडखैर

### व्हा.चेअरमनपदी अफसर पाशा, मानद सचिवपदी बापूसाहेब जगदाळे; तिन्ही पदांवर बिनविरोध निवडी

नगर – महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी अजिनाथ उर्फ राजेंद्र दगडखैर (शेवगाव), व्हाईस चेअरमनपदी सय्यद अफसरपाशा (पुणे) आणि मानद सचिवपदी बापूसाहेब जगदाळे (श्रीरामपूर) यांची बिनविरोध निवड झाली. सर्व संचालकांच्या एकमताने झालेल्या या निवडीमुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा निवडीनंतर सत्कार करण्यात आला.

चेअरमन, व्हा. चेअरमन व मानद सचिवांच्या निवडीसाठी तांत्रिक भवन येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत चेअरमनपदासाठी अजिनाथ उर्फ राजेंद्र दगडखैर, व्हाईस चेअरमनपदासाठी सय्यद अफसरपाशा तसेच मानद सचिवपदासाठी बापूसाहेब जगदाळे यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज प्राप्त झाले. प्रत्येक पदासाठी एकच अर्ज प्राप्त झाल्याने आणि सर्व संचालकांनी एकमत दर्शविल्याने तिन्ही पदांवरील निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले.

ही निवड प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे सहाय्यक निबंधक बाळकृष्ण शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडली. संस्थेचे कार्यकारी संचालक अरुण इंगळे यांनी त्यांना सहकार्य केले. यावेळी संस्थेचे सर्व संचालक, सेवकवृंद तसेच सदिच्छा मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ संचालक भाऊसाहेब भाकरे म्हणाले, महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेने संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या कार्यातून आदर्श निर्माण केला असून, संस्थेने लौकिक मिळविला आहे.

सभासदांच्या हितासाठी विविध योजना राबविण्याबरोबरच ठेवीदारांसाठीही आकर्षक ठेव योजना राबविण्यात आल्या आहेत. संस्थेचा कारभार उत्तम पद्धतीने सुरू असताना नूतन पदाधिकारीदेखील याच वाटेवरून पुढे जात संस्थेच्या प्रगतीला अधिक गती देतील, असा विश्वास भाकरे यांनी व्यक्त केला.

# अ.ए. सोसायटी अध्यापक विद्यालयाचे यश

### पवित्र पोर्टलद्वारे २५ विद्यार्थ्यांची शिक्षकपदी निवड

नगर – महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टलद्वारे २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी करण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यापक विद्यालयातील तब्बल २५ विद्यार्थ्यांची शिक्षकपदी निवड झाली आहे. राज्यातील विविध जिल्हा परिषद, महानगरपालिका तसेच विविध शैक्षणिक संस्थांमध्ये या विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार शिक्षक म्हणून निवड झाली आहे. या यशामुळे अध्यापक विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेसह स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाच्या यशस्वी परंपरेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या टीईटी परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टलद्वारे २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षक म्हणून निवडण्यात आले. यामध्ये अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यापक विद्यालयातील २५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मेरीटनुसार झालेल्या या निवडीमध्ये प्रीतम काळे, रोहित दळवी, प्रवीण मिसाळ, सोनाली दातीर, अमृता कदम, सचिन बडे, गायत्री खराडे, नाजीया मण्यार, विकास गायकवाड, नवनाथ भुजबळ, सुहास मुरडे, अभय औटे, तनुजा तांबे, रुपाली झिंजुर्के, वैभव मोरे, मयुरी धनगर, कोमल नालकोल, शीतल गवळी, सलमान मोमीन, आकाश धलपे, आदित्य दारकुंडे, रेणुका खंडागळे, ओम जऱ्हाड, विष्णू रजपूत आणि रोहिणी कांडेकर यांची शिक्षकपदी निवड झाली आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार व शाळा समिती चेअरमन प्रकाश गांधी, संस्था विश्वस्त व शाळा समिती सदस्य गौरव मिरीकर, सुनंदाताई भालेराव, विद्यालयाचे प्राचार्य संदीप उबाळे, सर्व सदस्य, पदाधिकारी तसेच शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

तसेच संगमनेर येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट)चे प्राचार्य डॉ. राजेश बनकर, ज्येष्ठ अधिव्याख्याता व सेवा पूर्व विभाग प्रमुख औटी तसेच सांख्यिकीय विभाग प्रमुख नितीन टिळेकर यांनी प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया तसेच अध्यापक विद्यालयातील सर्व यशस्वी विद्यार्थी, प्राचार्य संदीप उबाळे आणि सर्व स्टाफचे अभिनंदन केले आहे.

# अहिल्यानगर सीए शाखेतर्फे ८२ शाळा–महाविद्यालयांत करिअर मार्गदर्शन

नगर – द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) यांच्या 'करिअर इन अकाउंटिंग अँड फायनान्स फॉर यूथ' समितीच्या वतीने संपूर्ण देशभरात एकाच दिवशी इयत्ता आठवीपासून पुढील विद्यार्थ्यांसाठी सीए अभ्यासक्रम तसेच अकाउंटिंग आणि फायनान्स क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शनपर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर सीए शाखेच्या वतीने अहमदनगर एज्युकेशन सोसायटी येथे इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटी येथे विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन चर्चा सत्र आयोजित केल्याबद्दल सीएशाखेच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करताना छायाताई फिरोदिया.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना अहिल्यानगर सीए शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी विद्यार्थ्यांनी करिअरची निवड करताना स्वतःची आवड, क्षमता तसेच भविष्यातील उपलब्ध संधी यांचा विचार करावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांना योग्य करिअरची दिशा मिळण्यास अशा उपक्रमांमुळे मोठी मदत होईल असे मत संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी व्यक्त केले.

यावेळी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया, सल्लागार समिती सदस्य भूषण भंडारी, सीए शाखेचे उपाध्यक्ष सीए महेश तिवारी, सचिव सीए महेश भळगट, खजिनदार सीए सुनंदा रच्चा, समिती सदस्य सीए काजल चंदे, माजी अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक, प्रमुख वक्ते सीए शतानंद कलेधोणकर, सीए संदीप देसरडा तसेच शाळेचे मुख्याध्यापक कैलास साबळे, प्रभाकर भाबड, रविकिरण भांड उपस्थित होते.

तज्ज्ञ मार्गदर्शक सीए शतानंद कलेधोणकर यांनी विद्यार्थ्यांना दहावी आणि बारावीनंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअरच्या संधींबाबत सविस्तर माहिती दिली. चार्टर्ड अकाउंटंट (सीए) अभ्यासक्रमाची रचना, प्रवेश प्रक्रिया, अभ्यासाची पद्धत आणि भविष्यातील करिअरच्या संधी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच वाणिज्य, विज्ञान आणि कला शाखांमधील विविध अभ्यासक्रमांबाबत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

दरम्यान, सीए नगर शाखेच्या वतीने हे अभियान संपूर्ण जिल्ह्यात व्यापक स्वरूपात राबविण्यात आले. तब्बल ८२ शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करण्यात आले असून १५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. अहिल्यानगर शाखेने राबविलेला हा उपक्रम भारतातील एकूण १८६ सीए शाखांमध्ये विक्रमी ठरला आहे, असे सीए शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी सांगितले. या उल्लेखनीय यशाबद्दल नगर शाखेच्या सर्व सीए सभासदांसह विभागीय व केंद्रीय परिषदेच्या पदाधिकाऱ्यांकडून शाखेचे अभिनंदन करण्यात येत आहे.

